सत्यशोधक विद्यार्थी संघटना प्रकाशन










सत्यशोधक विद्यार्थी संघटना प्रकाशन
सत्यशोधक कार्यालय, ७५४, कसबा पेठ, पुणे - ४११०११



# प्रेमाचा 'अधिकार' आणि हिंसेचा प्रश्न

-शर्मिला रेगे

# प्रास्ताविक

प्रेम हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा जिव्हाळ्याचा विषय. प्रेमाविषयी असंख्य समज - गैरसमज युवकांच्या मनात असतात. महाविद्यालयात प्रेमाविषयी वक्तृत्व स्पर्धा घेतल्या की  की त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळतो. प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असते. ह्यांचे - त्यांचे, तुमचे आमचे अगदी सेम असते' ह्या मंगेश पाडगावकरांच्या काव्य पंक्ती किंवा 'प्रेम कुणावरही करावे' ही कुसुमाग्रजांची कविता मुले तोंड पाठ म्हणून दाखवितात.

मागील काही वर्षात या चर्चाचे स्वरुप थोडे बदलताना दिसते.'प्रेम' म्हटले की मुली हिसांचाराच्या मुद्यावर भर देतात अन् मुले मुलींनी जरा प्रमाणिक रहावं असा सुर काढताना दिसतात. त्यांच्या मते, गुरुदासच्या 'प्यासाचा' जमाना आता सरला आहे. आता हिंदी चित्रपटातील नायकासारखे, 'तुम मुझे भुल भी जाओ तो ये हक है की 'तुमका', हमने तो तुमसे मुहोब्बत की है' असे आम्ही म्हणणार नाही. आता आम्ही प्रेमवीर 'तु औरोंकी क्यों हो गई है' असे विचारणार. इतकेच नाही तर 'मुझसे बात न करो, तो कोई बात नही, गैर को चाहोगी तो मुश्किल होगी !' अशी मानसिकता बदलत चालली आहे.

कॉलेज कट्ट्यावरील तथाकथित प्रेमवीरांकडून मुलींना होणारा त्रास वाढत चालला आहे. मुलींचे मानसिक खच्चीकरण मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. मुली कॉलेजच्या आवारात आल्या की, 'ए क्या बोलती तू' आती क्या खंडाला' म्हणून दबावाचे, भयाचे वातावरण कॉलेजवर पसरत चालले आहे. वास्तविक प्रेम ही एक उत्कट, तरल भावना, पौगांडावस्थेत मुला - मुलींना परस्परांचे आकर्षण वाटते. एकमेकांचा सहवास हवाहवासा वाटतो. तासंतास गप्पा मारत रहावेसे वाटते. त्यातून काही मुलामुलींचा ग्रुप तयार होतो. त्यांचे नामकरण ही होते. हा 'सम्राट ग्रुप' तो 'युनिक ग्रुप' अमुक एक 'खिलाडी ग्रुप'. आता नामकरणही बदलले. आता 'किलर ग्रुप' अस नाव मिरवण्यामध्ये अजिबात संकोच वाटेनास झालाय. त्यात कुणालाच काही गैर वाटत नाही.

केवळ आकर्षण म्हणजे प्रेम नसते. प्रेमात एकमेकांसाठी सर्वस्वाचा त्याग करणे, समर्पण करणे असे काही अर्थ रुढ असतात. पण सर्वस्वाचा त्याग कोणी करायचा?, कोणी कोणाला आपलं सारं आयुष्य समर्पित करायचं ?, तर मुलींनी! हा प्रेमाचा खरा अर्थ होवू शकत नाही. प्रेमात एकमेकांचा आदर केला गेला पाहिजे, आपली प्रेयसी आपल्यासारखीच एक व्यक्ती आहे. दासी किंवा आपले सर्व ऐकणारी



बाहुली नाही याचे भान असले पाहिजे. आणि आपले प्रेम हे एका निकाप मैत्रीवर उभं असले पाहिजे. त्यात प्रियकर आपला केव्हाही अपमान करेल, आपल्याला वाऱ्यावर सोडेल, आपला खून करेल असं भय वाटता कामा नये. प्रेमाचा आधार परस्परांवरील विश्वास, एकमेकांशी जुळलेली विचारांची तार, ही असली  पाहिजे.

प्रेम आणि हिंसा खरे तर परस्परविरोधी संकल्पना. ज्याप्रमाणे एक म्यानात दोन तलवारी राहू शकत नाही त्याप्रमाणे जिथे खरं प्रेम आहे तिथे हिंसा असताच कामा नये. परंतु 'माझा नवरा मला मारतो कारण त्याच माझ्यावर खरं प्रेम आहे' असा समज स्त्रियांचा बनविला जातो. प्रेमात मालकी हक्काची भावना नसते. परंतु कुटुंब व्यवस्थेत मालकी भावना हाच प्रेमाचा आधार बनतो. मी माझ्या बायकोला मारेन किंवा तिची पूजा करेन तुम्हाला काय त्याचे ? हा आमचा खाजगी प्रश्न आहे, असे म्हटले जाते. यातून काय व्यक्त होते ? माझी बायको ही माझ्या 'माझ्या मालकीची वस्तू ' आहे. तिच्याशी मी कसा व्यवहार करायचा हे मी ठरवेन. हा प्रभुत्ववाद आहे. प्रेमात प्रभुत्ववादाचे काय काम? पण पुरुषप्रधान कुटुंब व्यवस्था या प्रभुत्ववादाला बळकटी देते. यातून प्रेमातून मने जुळण्याऐवजी अत्याचारांची गंभीर समस्या निर्माण होते. कुटुंबातून काही मूल्य संस्कार घेवून आपण मोठे होतो आणि पिता (पुरुष) 'कर्ता' अन् आई (स्त्री) 'अश्रित' असते हा ढाचा मनावर बिंबतो.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रेमविषयक कल्पना या आभाळातून पडत नाहीत. तर विशिष्ट सामाजिक/राजकीय/ आर्थिक परिस्थितीत प्रेमाचा अर्थ बदलत जातो. महाविद्यालयांमध्ये प्रेमप्रकरणे, प्रेमापोटी पळून जाऊन लग्न करणे, प्रेमभंग होणे या घटना घडतच असतात. परंतु गेल्या १० वर्षापासून प्रेमभंगाचे पर्यावसन मुलींच्या खूनामध्ये होताना दिसते. पूर्वी प्रेमभंगातून कॉलेज सोडणे, किंवा काही दिवस व्यसन करणे असे प्रकार महाविद्यालयामध्ये होत असत. आता आपल्या प्रेमाला नकार देणाऱ्या मुलीचा निघृण खून केला जातो. प्रेमभंगात हा गुणात्मक बदल कसा झाला आणि का झाला? याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. प्रेमभंगाची कारणे संबंधित मुला-मुलींच्या स्वभावात, त्यांच्या पेहरावात, खाजगी वाहिन्यांच्या परिसरात, चित्रपट माध्यमात शोधणे म्हणजे प्रश्नाच्या मुळाशी जायचेच नाही असे ठरविण्यासारखे आहे. फक्त चित्रपट पाहून माणूस कृतीप्रवण होत नाहीत. प्रेम आणि हिंसेच्या प्रश्नाचे मूळ आपल्याला बदलत्या समाजव्यवस्थेत व अर्थव्यवस्थेत शोधले पाहिजे.

भारताने मिश्र अर्थव्यवस्थेला 'रामराम' ठोकून खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरणाचे नारे दिले गेले. मोठ्या प्रमाणात परकिय भांडवल भारतात येऊ लागले. अन् बघता बघता बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विळख्यात भारतमाता अडकली. या बदलत्या अर्थकारणाने स्वत:सोबत

एक उपभोगवादी, चंगळवादी संस्कृतीला जन्म दिला. कापड बाजारातील कपड्यांच्या दुकानांची जागा आता लॉटरी सेंटर्सनी घेतली. कोणत्याही प्रकारचे उत्पादक श्रम न करता चैनीचे जीवन जगण्याचे स्वप्न लॉटरी पुरे करणार ! असे स्वप्न तमाम जनतेला दाखविले गेले. दोन रुपयाचे लॉटरीचे तिकिट अन् एक लाखाचे बक्षिस ! दुसरीकडे चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली. टि. व्ही, फ्रिज, कार, बाईक, चॉकलेटस, सौंदर्य उत्पादने आता 'इंटरनॅशनल' असल्याच्या जाहिराती झळकू लागल्या. या वस्तूंच्या वापरातील चंगळ/चैन आपल्याला हवी असेल तर आता विनाकष्ट 'हुंड्या' सारख्या प्रथेतून ती मिळविण्याचे स्वप्न तरूण उराशी बाळगू लागला. 'यूज ॲण्ड थ्रो' कल्चर वाढत चालले. भांडवलही भणगं बनले. 'डॉन' होवून - खंडणी घेणारी माणसे समाजात प्रतिष्ठित बनली. या साऱ्यांसाठी हिंसाचार गरजेचा होता. तो 'स्वाभाविक' मानला जावू लागला.

तिसरीकडे राजकारणात फॅसिस्ट शक्तींचा उदय मोठ्या प्रमाणात झाला. फॅसिझम हिंसेचे पूर्ण समर्थन करतो. राजकारण आता गुंडांनी ताब्यात घेतले. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले. तो एक व्यवसाय बनला. जात-जमात-धर्माच्या नावावर दंगली घडवून लोकांना हिंसक बनविले गेले. मुक्त अर्थव्यवस्थेने बेकार तरूणांची फौज एकीकडे निर्माण केली तर दुसरीकडे फॅसिस्ट शक्तींनी त्या तरूणांना रक्तपाताची सवय लावली. सर्वार्थाने हिंसक वातावरणाची निर्मिती होत गेली. या बेरोजगारांमध्ये बहुसंख्य होते तमाम बहुजन समाजातील युवक, जातीबध्द समाजाने त्यांना एकीकडे उत्पादनाचे स्वातंत्र्य नाकारले तर दुसरीकडे मुक्त अर्थव्यवस्थेने नव्या रोजगारातून बहुजन तरूणांना हद्दपार केले.

सर्वत्र पसरलेल्या हिंसेने प्रेमाने ग्रासले. मी ज्या मुलीवर प्रेम करतो तिने मला नाही म्हणताच उपयोगी नाही. ती मुलगी असल्यामुळे तिला नकाराचा अधिकार नाही असा पुरुषप्रधान - भोगवादी दृष्टिकोन बळावला. अर्थकारण, राजकारणात हिंसा होते त्याचा प्रयोग तथाकथित प्रेमातही सुरु झाला. रिंकू पाटील, जान्हवी तुपे, अमृता देशपांडे, निता हेंद्रे अशा अनेक मुली प्रेमात नकाराचा अधिकार वापरल्यामुळे प्राणाला मुकल्या. या केवळ 'एकतर्फी' प्रेमातून खुन झाल्याच्या घटना होत्या असे सरळसोट विधान करता येणार नाही, हे ही खरे. कारण बरेचदा ही प्रेमप्रकरणे 'एकतर्फी' नसतात. अनेक कारणांमुळे प्रेमभंग होतात. उदा. परस्परांच्या आकर्षणातून प्रेम होते. दोन वर्ष दोघेही प्रेमात आणाभाका घेतात, लग्नाचे स्वप्न पाहतात.पण मुलीच्या घरच्यांनी तिला स्थळ बघायला सुरुवात केली की प्रेमातील नाजूक नात्यामध्ये ताण निर्माण व्हायला सुरुवात होते. प्रियकर मुलगा दुसऱ्या जातीतील असेल तर अधिकच गंभीर प्रश्न निर्माण होतो. घरच्यांनी (कुटुंबाच्या) जातिव्यवस्थाक दबावातून ती मुलगी



'आपल्याला लग्न करता येणार नाही' असे सांगते. मुलामधील 'स्व' 'इगो' दाखवितो. आणि परिणामी मुलीच्या खूनामध्ये होतो. येथे लक्षात घ्यायला हवे की, मुलगा जन्मत: खुनी - गुंड नव्हता. जातीव्यवस्थेने दंडक घालून दिला आहे की लग्न स्वजातीमध्येच झाली पाहिजेत. कुटुंब हा दंडक मुलीवर लादू लागले. म्हणजे जातीनियम पाळण्यासाठी हिंसाही करण्यास जातीव्यवस्था भाग पाडत असते.

काही वेळा मुलगा कनिष्ठ मानला गेलेला व्यवसाय, कामधंदा करीत असतो. मुलीच्या घरच्यांना तो पसंत होणार नसतो, म्हणून नकार दिला जातो. प्रेमभंगातून हिंसा घडू शकते. म्हणजे प्रेम करण्यात काही दोष नाही, दोष आहे समाजव्यवस्थेत, पुरुषप्रधान संस्कृतीत, जातीबध्द समाजात. हा समाज मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करत नाही उलट स्त्रियांना दुय्यमत्वाचा संस्कार देतो. म्हणून अनेकदा मुली कुटुबांच्या दबावाला बळी पडतात. त्या अत्यंत सुरक्षित वातावरणात जगत असतात. पळून जाऊन लग्न केल्यास कुंटुबाचे 'संरक्षक' कवच गमावण्याची भिती त्यांना वाटते. ही भयग्रस्तता जातीसमाजात 'बहिष्कृत' होण्याच्या शिक्षेतून येते. हे लक्षात घेतले पाहिजे. जातीचा खोटा अभिमान प्रेमाच्या आड येतो हे वास्तव स्वीकारून त्यासंदर्भात प्रबोधन करणे गरजेचे आहे.

नीता हेंद्रे या मुलीच्या निघृण खूनानंतर २९ सप्टेंबर १९९९ रोजी सत्यशोधक विद्यार्थी संघटनेने पुण्यात अलका टॉकीज ते महात्मा फुले वाडा अशी विद्यार्थी रॅली काढली त्यात विद्यार्थीनींचा अत्यंत उत्स्फूर्त पुढाकार होता. स्त्री-पुरुष समतेचे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सुरु झालेले प्रबोधन पुढील टप्प्यावर नेण्यासाठी पुणे विद्यापीठातील अभ्यासक डॉ. शर्मिला रेगे यांना पुस्तिका लिहिण्याची विनंती केली. या पुस्तिकेत प्रेम, प्रेमाचा इतिहास, सामाजिक-आर्थिक कारणांच्या पार्श्वभूमीवर प्रेमाचे हिंसेत रुपांतर होणे, पुरुषप्रधानतेमुळे येणारी बंधने इ. चर्चा डॉ. शर्मिला रेगे यांनी केली आहे. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पुस्तिका लिहून दिल्याबद्दल त्यांचे आभार. हिंसेच्या विरोधात तातडीने प्रतिकाराची पावले उचलण्यासाठी मुलींना काय करता येईल याचे थोडक्यात दिग्दर्शन डॉ. अमिता देशमुख यांनी केले आहे त्यांचेही आभार.

-प्रकाशक

# प्रेमाचा 'अधिकार'आणि हिंसेचा प्रश्न

गेल्या दहा वर्षात तरूण मुलामुलींसमोर अनेक नवीन प्रश्न उभे राहिलेले दिसतात. माहिती तंत्रज्ञानामुळे पूर्वीच्या अभ्यासक्रमांना बाजारपेठेने जवळजवळ मोडकळीत काढलेले आहे. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न नव्या व अधिक भीषण स्वरुपात उभा राहिला आहे. ह्यातून मार्ग काढावा म्हणून हजारो रुपये खर्च करून (उधार घेऊन) computer कोर्स करण्याची एक नवीनच सक्ती तरुणांवर येऊन ठेपली आहे. ती कोर्स करूनही नोकरी मिळेल ह्याची काहीच शाश्वती नाही. ॲडमिशन घेतानाची धक्काबुक्की, फी-वाढ ह्या समस्या जोडीला आहेतच. टी. व्ही. चॅनेल्स -सिनेमा-जाहिरातीतून दिसणारा तरूण वर्ग मात्र ह्या कशानीच ग्रासलेला, त्रासलेला दिसत नाही. भरपूर वस्तू, सुंदर स्थळे, उच्च कपडे, खाद्य-पदार्थ व पेय एकंदरीत चंगळ हेच तरूणांचे जीवन उद्दिष्ट व पूर्ति असल्याचा आभास निर्माण केला जात आहे. मंडल आयोगाच्या विरोधात हिंसक पध्दतीने रस्त्यावर आलेला तरूण वर्ग, मस्जीद पाडायला सरसावून गेलेला तरुण वर्ग, मैत्रिण प्रेमाला नाही म्हणाली म्हणून तिला जाळून / मारून टाकणारा तरूण वर्ग हे असं चालणारच असे म्हणणारा तरूण वर्ग हे आपल्या कॉलेजविश्वाचे वास्तव आहे. ह्या वास्तवाचीच एक चिंताजनक बाब म्हणजे गेल्या दहा वर्षातील तरुणींचे वाढते प्रमाण.

आता तरुण मुलींना एका नव्या हिंसक प्रकाराला तोंड द्यावे लागत आहे. रिंकू पाटील, वीणा देशमुख, सत्वगुणी जाधव, जान्हवी तुपे, वैशाली पाटील, अमृता देशपांडे, नीता हेंद्रे, अनिता श्रीखंडे.....अशा अनेक तरूण मुलींची हत्या करण्याचेच प्रकार घडले. वर्तमानपत्रातून ह्या 'एकतर्फी प्रेमाच्या' घटनांबद्दल अनेक चर्चा झाल्या. उलट-सुलट प्रश्न विचारले गेले. तिचे आधी त्याच्यावर प्रेम होते की नव्हते? ... तिची फक्त मैत्री होती का काही अधिक होते? तिच्या मनात काहीच नव्हते तर मग तिने घरात - कॉलेजात- कुठेच तक्रार का केली नाही ? कसे? का? केव्हा मारले? मुलींमध्ये भितीचे वातावरण पसरले तर अनेकांना एस.टी. लोकलने - कॉलेजला एकटे कसे पाठवयाचे असा प्रश्न पडला. बहुजन कुंटुबांमधुन नव्यानेच उच्च शिक्षणाला बाहेर पडलेल्या मुलींना आपल्या महाविद्यालयात जाण्यावर बंदी तर घातली जाणार तर नाहीना अशी चिंता भेडसावू लागली. झाले हे चुकीचे झाले असे वाटत असतानाही अनेक मुलांमध्ये 'मुलींचे सुध्दा चुकते. प्रेम एकावर करतात लग्न दुसऱ्या बरोबर' असा एक तक्रारीचा सूर होता. अनेक मोठी माणसे, ह्या सर्व घटनांचे खापर तरूण पिढीच्याच डोक्यावर फोडून आमच्या वेळेस असे नव्हते... तुमच्या पिढीला काही ध्येयच नाहीत. असा शेरा मारून मोकळी झाली. काही विद्वांनांनी व राजकर्त्यांनी प्रसारमाध्यमांच्या वाढत्या प्रभावाकडे बोट दाखवून त्यातून प्रसारित होणाऱ्या पाश्चिमात्य संस्कृतीला दोषी ठरवले. एकंदरीत नक्की दोष कोणाचा होता. प्रेम खरेच 'एकतर्फी' होते का नव्हते. अशा तपशीलांवर चर्चा झाली. आपल्याला प्रत्येक घटनेच्या तपशीलात जाण्याची काहीच गरज नाही कारण प्रश्न केवळ



रिंकु, नीता, जान्हवी इ. च्या वागणूकीचा वा प्रसारमाध्यमांचा नसून तो आपणा सर्वांचाच आहे. या घटनांचा केवळ तपशील पाहण्यापेक्षा या घटना का घडल्या त्याचे विश्लेषण केले पाहिजे. अमृता, निता, रिंकु इ. सर्व खून प्रकरणांमधून काही समान धागे आपल्या हाती लागतात.

मुलांनी मागितलेल्या Friendship (मैत्री) ला मुलींनी नकार दिला होता. संबंधित मुला-मुलींमध्ये काही काळ मैत्री होती, काही कारणाने मुलींनी मैत्री संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला होता व 'नकार' दिलेल्या मुलींना हिंसक रित्या मारून टाकण्यात आले. काही घटनांमध्ये मुलांनी स्वत:च्या जीवाचाही अंत केला. संबंधित घटनांमध्ये मुलगे व मुली वेगवेगळ्या जातीतील होते. तथाकथित 'प्रेमाचा' अर्थ हा मुलीवर मालकी हक्क प्रस्थापित करणे - असाच लावला गेला. म्हणून 'तू माझी होऊ शकली नाहीस तर.... कोणचीच होऊ शकणार नाहीस' असा दावा हे प्रेमवीर करीत होते.

मुलींच्या हत्या सार्वजनिक ठिकाणी किंवा लोकांच्या उपस्थितीत झाल्या. तरीही लोकांनी मध्ये पडून मुलींना वाचवण्याचा प्रयत्न केल्याचे आढळत नाही. मुलींनी, मुले देत असलेल्या धमक्यांबद्दल घरी, कॉलेजमध्ये अथवा संघटनेमध्ये तक्रार नोंदवली नव्हती.

या सर्व निरिक्षणातून पुढील मुद्यांचा विचार झाला पाहिजे.

※प्रेमाचा अर्थ हा एखादीवर मालकी हक्क प्रस्थापित करणे इतकाच असतो का ? तसे असल्यास का ?

※मुलींना 'नकार' देण्याचा अधिकार का नाही?

※ मुली घरात ह्या घटनांबद्दल का बोलत नाहीत?

※ मुलींना 'स्वातंत्र्य' मिळाल्यामुळे अशा घटना घडतात का ? मुली घराबाहेर पडून मुलांच्या बरोबरीने वावरू लागल्यामुळे असे प्रकार घडतात का?

※जातिव्यवस्था - प्रेम- विवाह - हिंसा - व मुलींचे समाजातील दुय्यमत्व ह्यांच्यातील नेमका संबंध काय?

※ मुलींकडे उपभोग्य वस्तू म्हणून का बघितले जाते ?

※ प्रसार माध्यमांचा,पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाचा हा परिणाम आहे का? याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

प्रेम किंवा त्यातून होणारा मुलींचा खून, हिंसा या गोष्टी अचानक, अजाणतेपणाने घडत नाहीत. विशिष्ट सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीत त्या निर्माण होतात. प्रेमाला एक सामाजिक पार्श्वभूमी आणि अर्थ असतो. तो काळानुरुप घडत व बदलत जातो. तसाच प्रेम आणि हिंसेचा संबंध असतो आणि त्याचाही एक इतिहास असतो. हा इतिहास काय सांगतो? अशा घटना अचानकपणे घडणाऱ्या नाहीत. समाजातील जात, वर्ग, स्त्रीदास्या सारख्या शासन-शोषण व्यवस्थांचा 'प्रेमाशी मुलींवर

होणाऱ्या हिंसेशी' संबंध असतो. या संबंधाचे नेमके स्वरुप काय? इत्यादी बाबींवर चर्चा होणे गरजेचे आहे.

कुठच्याही प्रश्नावर, मग तो बेरोजगारीचा असो-अथवा मुलींवर होणाऱ्या हिंसेचा असो, तयार उपाययोजना कोणाकडेच नाहीत. पण ह्या प्रश्नांवर उत्तरे शोधण्यासाठी इतिहास तपासून हा प्रश्न कसा घडला? इतिहासात त्यांची पाळेमुळे कुठवर गेलेली आहेत हे पाहणे गरजेचे असते. मुलींवरील हिंसेची सुरुवात काही रिंकू पाटीलला जाळण्यापासून झालेली नाही. त्या आधीही समाजात तरूण मुलींवर अत्याचार होत होतेच. त्या हिंसेच्या व आज होणाऱ्या हिंसेच्या फक्त स्वरुपात बदल झालेला आपल्याला दिसतो. त्याची कारणे शोधणे गरजेचे आहे. समाजातील - आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व्यवस्थांमधील बदलाबरोबरच हिंसेचेही स्वरुप बदलते. ह्या सर्व बाबी तपासून पाहण्याकरिता प्रेमाचा व हिंसेचा इतिहास तपासून पाहणे गरजेचे आहे. उत्पादन संबंध बदलले की स्त्री-पुरुष इतिहासात घडत जातात. म्हणजे समाजातील विविध व्यवस्था (जात, वर्ग, पुरुषप्रधानता)स्त्री - पुरुष संबंधाना काय आकार देतात ? तसेच समाजातील विविध संस्था (कुंटुंब, शिक्षण, प्रसारमाध्यम) या बाबतीत कोणती भूमिका बजावतात हे पाहणे जरुरीचे आहे. थोडक्यात, प्रेम किंवा हिंसा या काही नव्या, आताच अवतरलेल्या बाबी नाहीत. आपल्या समाजातील इतर प्रश्नांना जसा एक इतिहास आहे, तसाच प्रेमाला ही इतिहास आहे.

**'प्रेमाला' ही इतिहास असतो :**

व्यक्ती-व्यक्तीमधील परस्परसंबंधीचे आकर्षण सर्व समाजांच्या इतिहासामध्ये सापडते. स्त्री - पुरुषांमधील आकर्षण ही सार्वत्रिक बाब आहे. पण 'प्रेम कशाला म्हणायचे, 'खरे प्रेम', 'उच्च प्रेम' कोणते इ. बद्दलच्या कल्पना संस्कृती व इतिहास सापेक्ष असतात. प्रत्येक समाजात अनेक 'खऱ्या प्रेमाच्या' कथा पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या आहेत. शिरी-फरहाद, हीर-रांझा, सलीम-अनारकली, लैला - मजनू , सासी- पुनौ, ... अशा अनेक प्रेमवीरांच्या गोष्टी, कविता, कथा, चित्र, कांदबरी, सिनेमारुपाने आपल्या समोर मांडल्या जातात. ढोबळमानाने सरंजामी अर्थव्यवस्थेवर आधारित असलेल्या समाजामध्ये 'प्रेम' म्हणजे 'त्याग' असे समीकरण केले जाते. 'प्रेमाचा' शरीराने मनाने त्याग केल्यानंतरच ते प्रेम थोर बनते. प्रेम व कर्तव्य ह्यांच्यातील द्वैत ही ह्या समाजात सतत ठळकपणे पुढे आणले जाते. आपण १९३०-४० च्या दशकातील हिंदी सिनेमातील हिरो आठवला तर तो सतत ह्या द्वैतात अडकलेला आढळतो. राष्ट्र, कुटुंब, समाज-निगडीत कर्तव्य व प्रेम ह्यांच्या द्वैतात तो अडकलेला आढळतो. 'आदमी' इत्यादी सिनेमे ह्या प्रकारचे द्वैत मांडतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर आधारित समाजात मात्र 'प्रेम' हे स्वायत्त, व्यक्तिधिष्ठित असते, ते आपल्या' ह्यीळीं 'ने (हिम्मतीवरच) कसे प्राप्त करता येते इत्यादी कल्पना मुळे धरू लागतात. ५०-६० ह्या दशकातील सिनेमामध्ये गरीब हिरो स्वत:च्या हुशारीच्या बळावर 'श्रीमंत हिरोईन' चे व तिच्या वडलांचेही मन अंतत: जिंकताना दिसतो. अगदी १९७०-



८० पर्यंतच्या दशकात 'प्रेम' व सामाजिक बांधिलकी यांची संपूर्ण फारकत केली गेली नव्हती. अगदी बॉबी, एक दुजे के लिए सारखे सिनेमे पाहिले तरी आपल्या लक्षात येईल की 'धर्माच्या', खोट्या प्रादेशिकतेच्या भिंती तोडण्याचीही एक जबाबदारी प्रेमिकांवर असते याचे भान होते. उदारीकरणाचे, जागतिकीकरणाचे वारे फिरू लागल्यानंतर - भांडवलशाहीचे स्वरुपही बदलू लागले. Information Technolog (माहिती तंत्रज्ञान) व प्रसार माध्यमांवर अधारित अर्थव्यवस्थेमध्ये 'नफा' हा सरळसोटपणे उपभोक्ता वर्ग वाढण्यावर अवलंबून असतो. बहुराष्ट्रीय कंपन्यांमधून, चॅनल्समधून नोकऱ्या करणाऱ्या उच्च मध्यमवर्गातील तरूण - तरूणींच्या वाढत्या उपभोक्तावादावरच नफ्याचे प्रमाण ठरते. मग 'प्रेमाला ' ही 'उपभोगाचा' एकमात्र पाया प्राप्त होतो. व्यक्तिपेक्षा वस्तुला जास्त - प्रेमापेक्षा वातावरण निर्मितीला अधिक महत्व प्राप्त होते. अगदी हम आपके है कौन (HAHK), दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे (DDLG) ते कुछ कुछ होता है (KKHH) ची कथानके तपासून पाहिली तर हे आपल्या लक्षात येईल. HAHK मध्ये प्रेमीयुगलापेक्षा टेडी बिअर, आईस्क्रिम, जल्लोष यांच्यावरच अधिक फोकस येतो. - DDLG पासून तर भारतीय भूमिवर 'प्रेमी युगलांकरिता' सही, योग्य वातावरण सापडेनासे होते. सर्व 'प्रेम' हे कॅनडा च्या दऱ्या - खोऱ्यातच शक्य होऊ लागते. 'वस्तुंचा उपभोग' व प्रेम ह्यांच्यातील रेषा धुसर होऊ लागते. व बाजीगर सारख्या सिनेमात तर ही रेषा मिटूनच जाते. हिरोच्या प्रेमाला 'नकार' देणाऱ्या मुलीला संपवून टाकले जाते व ह्या भणंगतेचा उत्सवही मांडला जातो. जाहिरातीतील तरूण अभिमानाने म्हणतो I get what i want थोडक्यात प्रेम 'खरे प्रेम' कशाला म्हणायचे, कोण - कोणावर प्रेम करू शकते, ते व्यक्त कसे करायचे, इत्यादीच्या कल्पना, नियम सतत बदलत असतात. त्याग ते उपभोग हा 'प्रेमाचा' प्रवास कसा होत गेला हे तर आपण पाहिलेच. बदलत्या अर्थव्यवस्थेनुसार 'प्रेमाची' ही रंग कसे बदलत जातात हे आपण रजतपटावरच्या प्रेमाच्या बदलत्या कल्पनांच्या आधारे पाहिले. अधिक खोलात जाऊन, मानवी इतिहासातच, बदलत्या उत्पादनसंबंधाबरोबर नातेसंबंध कसे बदलत गेले हे तपासून पाहणे गरजेचे आहे.

**उत्पादन संबंध व स्त्री - पुरषांमधील नातेसंबंध**

मानवी इतिहासाकडे मागे वळून पाहिले तर बदलत्या उत्पादन संबंधाबरोबर स्त्री - पुरुषांमधील नातेसंबंध, विवाह व कुटुंब व्यवस्थांचे स्वरुपही बदलत गेले असल्याचे लक्षात येते.

एंगल्स सारख्या विचारवंतानी ह्याविषयी सैध्दांतिक मांडणी केलेली आहे. उत्पादनपध्दतीनुसार त्या त्या समाजातील स्त्री-पुरुषांमधील संबंधांचे स्वरुप बदलत जाते, हे त्यांनी ठळकपणे मांडले. शिकारीवर व कंदमुळे गोळा करण्यावर आधारित असलेल्या प्राथमिक समाजातील स्त्री-पुरुषांमध्ये खुले स्वैर संबंध होते. पुढे रक्ताचे नाते असलेल्या स्त्री-पुरुषांमधील संबंधावर बंदी घालण्यात आली. तरी हा समाज मातृसत्ताकच होता. पुढे पशुपालक अवस्थेत,पशुविनिमय सुरु झाला व त्यातून वरकड मूल्याची निर्मिती झाली. पशुविनिमयातून अतिरिक्त मुल्य तयार झाले. यापूर्वीच्या

समाजात उत्पादन ही केवळ 'उपजिविके' करिता होते. अतिरिक्त नव्हते. म्हणजेच आता खाजगी संपत्तीचा उगम झाला व वारसाहक्काचा प्रश्न उभा राहिला. खासगी संपत्ती कायम राखण्यासाठी ''औरस'' संततीकडेच ती संक्रमित करणे गरजेचे होते. ह्यातूनच स्त्रियांवरील अनेक बंधनांचा उगम झाला. मातृसत्ता डावलून, वडिलांचा अधिकार प्रस्थापित झाला. नव्याने उगम पावत असलेल्या राजसंस्थेनेही सत्ताधारी सांपत्तिक वर्गातील पुरुषांचे हितसंबंध जोपासले व स्त्रीदास्याचा पाया अधिक भक्कम केला. म्हणजेच जोपर्यंत मानवी समाजात खासगी संपत्ती नव्हती तोपर्यंत पुरुष स्त्रियांवर मालकी हक्क सांगून, त्यांच्यावर बंधने घालत नव्हते. खासगी संपत्तीच्या उगमाबरोबरच, स्त्रियांवरही पुरुषांचा, मालकी हक्क प्रस्थापित होतो. संपत्तीधारक वर्गातल्या स्त्रियांना चार भिंतीमध्ये चिणले गेले - व त्यांच्या पुरुषांनी त्यांच्यावर संपूर्ण मालकी हक्क प्रस्थापित केला. सार्वजनिक क्षेत्रात कष्ट करणाऱ्या कष्टकरी स्त्रियांचेही स्वातंत्र्य कालांतराने संपुष्टात आले. कुटुंबासाठी अर्थार्जन करणाऱ्या कष्टकरी वर्गातील स्त्रियांनाही मालकाच्या मर्जीनुसार वागणे अनिवार्य झाले.

बदलत्या उत्पादनसाधनांबरोबर स्त्री - पुरुषांच्या परस्परांमधील नातेसंबंधात परिवर्तन होत गेले. सरंजामी शेतीव्यवस्थेवर आधारलेल्या समाजात, श्रीमंत सत्ताधारी घराण्यांमध्ये संबंध प्रस्थापित करण्यासाठी स्त्रियांचा वापर करण्यात आला. तरुण मुलींच्या कौमार्याला अति महत्व प्राप्त झाले. कारण ह्या मुलींना 'खानदानी घराण्यात देऊन' , सत्ताधारी घराण्यातील आंतरसंबंध घट्ट करण्यात आले. राज्यव्यवस्थेनेही सत्ताधारी पुरुषांना आपल्या घरातील मुली बायकांना 'वळण लावण्यासाठी' संपूर्ण अधिकार बहाल केले. अनेक पाश्चिमात्य देशांमध्ये १९६० पर्यंत बायकामुलींना वळण लावण्यासाठी मारहाण करणे- कायद्यानुसार गैर ठरत नसे. औद्योगिक क्रांतिनंतर, सार्वजनिक व खासगी क्षेत्राचे विभाजन झाले; कामाची जागा व घर ह्यांच्यात विभेदन झाले. अशा समाजातील 'भांडवलदार' वर्गाने विभक्त कुटुंबाचे मूल्य जोपासले. कमवता पुरुष व घराचे घरपण टिकवणारी संगोपन करणारी स्त्री हे विभाजन ह्या वर्गासाठी सार्वत्रिक तर झालेच - पण स्त्री -पुरुषांमधील सुसंस्कृत नात्याचे प्रतिक मानले जाऊ लागले. इतर वर्गातील पुरुषांनीही आपल्या बायकांना अर्थार्जन करण्यापासून परावृत्त करावे व ह्या कष्टकरी स्त्रियांनीही बालसंगोपन करून चांगली पिढी निर्माण करावी असा आग्रह धरला जाऊ लागला. म्हणूनच अनेकदा 'स्त्री-पुरुषांसाठी समान वेतन' ह्या मागणीऐवजी प्रत्येक पुरुषांकरिता कौटुंबिक वेतनाची मागणी पुढे आली. ह्या सर्व घटनांना गोंडस स्वरुप देण्यासाठी ह्याच काळात Romantic विचारप्रणाली रुजवली जाऊ लागली. नाजूक अबला हिरोईन व तिचा उमदा रक्षणकर्ता हिरो यांच्यातील प्रेम म्हणजे ramance हे ह्या काळातील कथाकांदबऱ्यांनी अधोरेखित केले आहे. प्रेम म्हणजे सर्व जगाला विसरून आपले एक घरटे बांधणे, त्या घरट्याला घरपण देण्यामध्येच स्त्रीच्या प्रेमाची पूर्ती असते. इ. कल्पनाही या काळात रूढ होऊ लागल्या म्हणजेच बायकांच्या ह्या आर्थिक परावलंबित्वालाच 'खरे स्त्रीत्व' म्हणून अधोरेखित केले गेले. नाजूक,



हतबल, सुंदर, गृहकृत्यदक्ष प्रेमिका व रांगडा उमदा, कमवता, घराचा रक्षणकर्ता - प्रेमवीर याप्रमाणे प्रतिमा समाजात रुढ होत गेली. पुरुषप्रधान, भांडवली व्यवस्थेवर ीारपींळल विचारप्रणालीचे गोंडस आवरण दिले गेले. तरूण मुलींवर, बायकांवर आर्थिक परावलंबित्व लादून त्यांच्या लैंगिकतेवर, श्रमावर, बुध्दिमत्तेवर, साधनसामुग्रीवर पुरुषांनी मालकी हक्क प्रस्थापित केला. तो मला नजरेआड होऊ देत नाही, मी दुसऱ्या कोणाशी बोलले तरी त्याला चालत नाही, तो कमावण्यासाठी समर्थ आहे - मी घराचे घरपण टिकवते, माझे सर्वस्व मी त्यालाच अर्पण केले आहे. इत्यादी मुलाम्यांखाली, मालकी हक्क व लैंगिक हिंसा दडून जाते. 'प्रेमाच्या' नात्यांचा उत्पादन संबंधाशी, सत्तेशी काही संबंध असू शकतो-हे लक्षात देखील येत नाही. प्रेम, नातेसंबंध ह्या खासगी बाबी आहेत असा गोड गैरसमज रूढ होतो. म्हणूनच पुरुषप्रधान समाजातील स्त्री पुरुषांमधील संबंधाचे विश्लेषण करताना हे संबंध सत्तासंबंध आहेत, असे प्रतिपादन स्त्रीवाद्यांनी केले. पुरुषप्रधान व्यवस्था म्हणजे काय? स्त्री- पुरुषांमधील संबंध सत्तासंबंध का असतात? याची चर्चा करणे जरूरी आहे.

**पुरुषप्रधान समाजव्यवस्था**

जातीव्यवस्था व वर्गव्यवस्था ज्याप्रमाणे समाजातील शोषण -शासनाच्या व्यवस्था म्हणून ओळखल्या जातात त्याचप्रमाणे पुरुषप्रधान व्यवस्था ही समाजातील शोषण शासनाची व्यवस्था आहे. ही व्यवस्था नैसर्गिक नाही, किंवा स्त्री पुरुषांच्या जैविक भिन्नतेमुळे, शारिरीक रचनेमुळे ती उगम पावली नाही. तसे असते तर मानवी समाजाच्या इतिहासात मातृसत्ताक गण उभे राहिले नसते. गाळपेराच्या शेतीचा शोध स्त्रियांनी लावल्यामुळे व समाजधारणेसाठी आवश्यक असणारी प्रजननशक्ती तिच्याजवळ असल्यामुळे, आदिम समाजात गणभूमीचे वाटप, शासन व पौराहित्याचे अधिकार स्त्रियांना होते, असे कॉ. शरद पाटील प्रतिपादित करतात. या पार्श्वभूमीवर जैविकतेमुळे, शरीररचनेमुळे स्त्रिया दुय्यम ठरवल्या जातात असे म्हणणे अनैतिहासिक ठरले. पुरुषप्रधान व्यवस्था ही समाजाने रचलेली (सामाजिक) व्यवस्था आहे - ती कृत्रिम आहे, नैसर्गिक नाही. निसर्गत: स्त्रिया दुबळ्या, पुरुषांपेक्षा कमी कुवतीच्या, कमी बुध्दीच्या वगैरे असतात हे मत शास्त्रीय संशोधनाने चुकीचे ठरवले आहे. स्त्रियांवर दुबळेपणा समाजाकडून कृत्रिमरित्या, कुटुंब ते शासनसंस्था यांच्या साखळीमार्फत लादला जातो.

पुरुषप्रधान व्यवस्था ही केवळ कुटुंबापुरतीच मर्यादित असते असे म्हणणे चुक ठरेल. समाजातील सर्व महत्वाच्या व्यवस्थांमध्ये पुरुषसत्ता कार्यरत असल्याचे आपल्या लक्षात येईल. धर्मसंस्था अर्थकारण, शिक्षणसंस्था, कायदेव्यवस्था इत्यादींमध्ये पुरुषप्रधानता दिसून येते. उदाहरणार्थ, ब्राह्मणी हिंदु धर्माने शूद्र व स्त्रियांना अपवित्र ठरवले, श्रमाच्या बाजारपेठेतही स्त्रियांच्या श्रमाला दुय्यम ठरवून त्यांना कमी वेतन देण्यात येते. तांत्रिक, वैज्ञानिक ज्ञानशाखांपासून स्त्रियांना वंचित ठेवण्यात आले व कायद्यानेही स्त्रियांकडे वडिलांच्या किंवा पतीच्या पाल्य म्हणूनच पाहिले. केवळ पुरुषांचे मतपरिवर्तन करून हे सर्व बदलेल असे म्हणणे चुक ठरेल. पुरुषप्रधान व्यवस्था ही केवळ

मानसिकतेशी निगडीत नसून, प्रत्येक समाजात तिला ठोस पाया असल्याचे आपल्या लक्षात येईल. पुरुषप्रधान व्यवस्थेच्या भौतिक पायाचे घटक खालीलप्रमाणे

१) स्त्रियांच्या उत्पादनक्षमतेवर नियंत्रण

२) स्त्रियांच्या लैगिंकतेवर व प्रजोत्पादनावर नियंत्रण

३) स्त्रियांच्या सांपत्तिक व साधनसामग्रीवर नियंत्रण

पुरुषप्रधान व्यवस्थेमार्फत स्त्रियांच्या गतीशीलतेवर नियंत्रण ठेवले जाते.

अशा नियंत्रणातून पुरुषप्रधान व्यवस्था भक्कम केली जाते. मुलींना शिकवायचे की नाही, कुठपर्यंत शिकवायचे, काय शिकवायचे ह्यावर खुद्द मुलींचे नाही तर पित्याचे नियंत्रण असते. तसेच कोणत्याही मोबदल्याशिवाय मुलींनी घरातील काम केलीच पाहिजे. तेच तिचे खरे शिक्षण आहे असे मानले जाते. ह्या कामांना, काम समजले जात नाही. शेतीची कामे, घरातली कामे ही मुलींना करावीच लागतात. ती उरकून वेळ राहिला तर अभ्यास ! शिक्षण पूर्ण झाल्यावर, मुलीने श्रमाच्या बाजारपेठेत उतरायचे की नाही, कोणत्या प्रकारची नोकरी करायची इत्यादी निर्णय, घरातील पुरुष मंडळी घेतात. एखाद्या कुटुबांची आर्थिक स्थिती ढासळली तर मुलींचे शिक्षण पहिल्यांदा बंद केले जाते. आर्थिक सुबत्ता प्राप्त झाल्यास मुलींना घरात बंदिस्त करुन, लवकरात लवकर लग्न करून टाकले जाते.

पुरुषप्रधान समाजामध्ये लैंगिकतेच्या बाबतीत दुहेरी/ दुटप्पी नितीमुल्ये असल्याचे आपल्याला दिसून येते. मुलगे - चेष्टा करणारच पण तुझीच का केली? तू काय पोषाख घातला होतास? तू वर तोंड करुन त्यांच्याकडे बधितलच का ? अशा प्रश्नांना मुलींना अनेकदा तोंड द्यावा लागते. महाविद्यालयात शिकायला पाठवताना देखील कुटुंबाची जाती जमातीची इज्जत त्यांच्या वर्तनाशी कशी जोडलेली ह्याची समज प्रत्येक मुलीला दिली जाते. तिला शिकवून तिच्यावर उपकार केले जात आहेत असे तिच्यावर मनावर बिंबवून, एखादी जर चूक तिच्याकडून झाली तर शिक्षण बंद केले जाईल याची ताकीद दिली जाते. मुलींनी कसे बोलावे, चालावे, कुठे जावे-जाऊ नये याबाबत कडक नियम लागू केले जातात उदा. घरात मुलगी जन्माला आली त्यानंतर तिचे माता पिता दोघेही तिला हात धरून लवकर चालायला शिकवतात, लवकर बोलायला शिकवतात, पण त्याच मुलीशी काही काळानंतर घराच्या बाहेर जाताना अथवा बाहेरून येण्यास उशीर झाल्यास कुठे चाललीस, उशीर का झाला, तुला खुप पाय फुटलेत, गुपचुप घरात बस नाही तर तंगडे मोडीन या भाषेत वागतात. अनेकदा ह्या नियमांना धार्मिक व सांस्कृतिक अधिष्ठान दिले जाते.

सर्वसाधारणपणे संपत्ती व इतर साधनसामुग्रीवर पुरुषांचा अधिकार असतो. ह्यामुळे स्त्रियांना कायमचे परावलंबित्व स्विकारावे लागते. जमीन, जंगल, सामाजिक, सरकारी संस्थांवर पुरुषांचे नियंत्रण असते. अनेक अभ्यासातून सिध्द झालेले आहे की जर जमीन व सामुग्रीवर स्त्रियांना अधिकार मिळाला तर त्यांचा कुटुंबातील दर्जा उंचावतो.



पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या उत्पादनावर, उत्पादकतेवर, गती शीलतेवर, लैंगिकतेवर पुरुषांचे नियंत्रण असते हे खरे असले तरी स्त्रिया ह्या व्यवस्थेत संपूर्णपणे सत्ताहीन असतात असे म्हणणे चुक ठरेल. पुरुषप्रधान विचारप्रणाली समाजामध्ये इतकी खोलवर रुजलेली आहे की स्त्रियाही ती आत्मसात करतात. त्यामुळे अनेकदा 'आईच मुलीला' पुरुषप्रधानतेचे नियम आत्मसात करायला शिकवते. घराबाहेर पडण्याचे, परत येण्याचे, कोणाशी बोलावे - कोणाशी नाही, कसे बोलावे? हे वागण्या-बोलण्या-चालण्याविषयीचे नियम आई मार्फतच मुलीपर्यंत येतात. व म्हणून स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रू असतात असा एक गैरसमजही रूढ होतो. पुरुषप्रधान व्यवस्थेचे हे नियम बनवण्यामध्ये त्या 'आईला' फारशी भूमिका नसते. पण हे नियम राबवण्यासाठी एक साधन म्हणून पुरुषप्रधानव्यवस्था तिचा वापर करते.

वय/जात/वर्गानुसार स्त्रियांवरच्या नियंत्रणाचे स्वरुपही वेगळे असते. उदा. लैंगिक, आर्थिक, राजकीय, बौध्दिक दुय्यमत्व स्विकारले की त्या बदल्यात उच्चवर्गीय, उच्चवर्णीय स्त्रियांना कनिष्ठ जातीय, वर्गीय स्त्री-पुरुषांवर कमी-अधिक प्रमाणात सत्ता गाजवता येते. पुरुषप्रधान व्यवस्थेने त्यांना त्यांच्या 'आज्ञाधारकपणा' बद्दल दिलेले हे बक्षिस असते. तसेच 'आज्ञाधारक' किंवा पतिव्रता सून जेव्हा सासू होते तेव्हा तिला काही अधिकार दिले जातात. अशा प्रकारे स्त्रियांमार्फतच त्यांचे शोषण करणारी व्यवस्था कायम ठेवली तर जातेच शिवाय 'स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रू असतात' अशी कल्पनाही रूजवली जाते.

भारतीय समाजाचे वैशिष्ट्ये असलेल्या जातिव्यवस्थेमुळे, भारतातील पुरुषप्रधान व्यवस्थेची रचना ही गुंतागुंतीची बनते ह्या दोन व्यवस्थांमधील नेमका संबंध काय? तो कसा कायम केला जातो ह्याबद्दल चर्चा करणे गरजेचे आहे.

### जातीव्यवस्था व स्त्री-दास्य

आपल्या समाजात सर्व स्त्रियांकरिता पुरुषप्रधानतेचे नियम समान नसतात. सवर्ण मुलींना चार भिंतीत कोंडून 'घराण्याची अब्रू' शाबूत ठेवली जाते तर कोल्हाटणीच्या मुलीला शिक्षण बंद करुन फडावर नाचण्याची जबरदस्ती केली जाते. एकीचे 'कन्यादान' करण्याची घाई असते तर दुसरीला 'विवाहाचा' अधिकार नाकारला जातो. मनुस्मृतीने सर्व स्त्रियांसाठी समान नियम सांगितलेले नाहीत. कनिष्ठ जातीतील मुलींचे स्त्रियांचे श्रम-शेतीची कामे, घरगुती कामे, मनोरंजनासाठी वापरून घेतले. असे करताना कावेबाजपणे असा युक्तिवाद केला की कनिष्ठ जातीतील पुरुष आपल्या बायकांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ आहेत आणि म्हणूनच ते 'कनिष्ठ' आहेत. थोडक्यात जातिव्यवस्थेचे समर्थन केले गेले.

ब्राह्मणी धर्मशास्त्रकारांनी जातिव्यवस्था टिकवण्यासाठी उच्च जातीतील स्त्रियांवर नियंत्रणे घालून त्यांच्या- शूचितेला असामान्य महत्व दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उघड केल्याप्रमाणे 'स्त्रिया या जातीव्यवस्थेची प्रवेशद्वारे असतात' म्हणून त्यांच्यावर नियंत्रण ठेवूनच जातींची उतरंड ब्राह्मणी धर्माने कायम ठेवली, ब्राह्मणी ग्रंथांनी

'अनुलोम विवाह पध्दतीला' (उच्चजातीतील पुरुष व कनिष्ठ जातीतील स्त्री यांचा विवाह) समर्थन दिले. पण 'प्रतिलोम विवाह पध्दतीला' (उच्च जातीतील स्त्री व कनिष्ठ जातीतील पुरुष यांचा विवाह) कडाडून विरोध केला. जाती अंतर्गतच विवाह व्हावे म्हणून बालविवाहाची प्रथा रूढ करण्यात आली, तसेच विधवांना सती जाण्यास भाग पाडले केले गेले किंवा सक्तीचे वैधव्य त्यांच्यावर लादले गेले. जातिअंतर्गत वर मिळवण्यासाठी वधू पिता, वरपक्ष करेल ती मागणी( हुंडा) देण्यास तयार होवून लागला. थोडक्यात भारतातील जातिव्यवस्थेचा व पुरुषप्रधान व्यवस्थेचा जो अन्योन्य संबंध आहे त्याच्यामुळे तरुण मुलींना अनेक प्रकारच्या हिंसक प्रथांना बळी जावे लागले आहे.

## 'हिंसेचा' इतिहास

जात्यांतर्गत विवाहाचे बंधन हा जातीचा आत्मा आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिपादन करतात. त्यामुळे एखाद्या बालिकेचे, विधवेचे, तरुणीचे अथवा विवाहित स्त्रीचे जातीबाह्य संबंध प्रस्थापित होवू नयेत ह्याची खबरदारी ब्राह्मणी ग्रंथांनी व व्यवस्थेनी घेतल्याचे दिसून येते.

स्त्रीस्वभाव मूलत: हीन आहे, हे अधोरेखित करुन हा स्वभाव मोडून काढण्यासाठी कुटुंबातील पुरुषांना, ह्या स्त्रीस्वभावाला 'वळण' लावण्यासाठी हिंसेचा वापर करण्याची मुभा दिली गेली. 'अष्टवर्षा भवेत कन्या' हा नियमच होवून बसला. आठ वर्ष ही लग्नाची वयामर्यादा ठरल्यावर, त्यापेक्षा कमी वयात लग्न होणे अधिक चांगले म्हणून- तान्ह्या मुलींची लग्ने लावली जाऊ लागली. 'जातीतीलच' वर पाहिजे म्हणून मग वयाने मुलीचा बाप किंवा आजोबा शोभेल अशा माणसाशी लग्न लावून दिले गेले. ह्यातून बाल-विधवांचा प्रश्न उभा राहिलाच -पण भारतात अनेक ठिकाणी ह्या बाल-विधवेचे तारुण्यात आल्यानंतर 'वाकडे पाऊल' (जातीबाहेर संबंध) पडू नये म्हणून 'थंड सती' प्रथेचा उगम झाला. सर्वसाधारपणे बाल विधवा सती जाण्यास विरोध करत असे म्हणून अनेक ठिकाणी जरठ-पतिच्या निधनानंतर त्याच्या पत्नीने सती जायचे ठरवले असल्याच्या खुशीत 'ज्ञातिकरिता' जेवणाचा कार्यक्रम केला जायचा. बाल-विधवेला 'ह्या' प्रसादाच्या जेवणातून विष दिले जायचे व मृतदेह पतिच्या चितेवर ठेवला जाऊन सती सोहळा साजरा केला जायचा. सती न गेलेल्या बाल विधवांना 'सामाजिक मृत्यू' पत्कारावा लागे. केशवपन करुन तिच्या 'लेंगिकतेचा मृत्यू' जाहीर केला तरी घरातील इतर पुरुष तिचा गैरफायदा घेतच असत. त्यांना नाही म्हणण्याचा अधिकार तिला नव्हता.

आपल्याला असे लक्षात येईल की विवाहाचे उद्दिष्टचे जातीच्या उतरंडीला पक्के किंवा मजबूत करणे हे होते. मनुस्मृती मध्ये विवाहाचे आठ प्रकार सांगितले गेले: ब्रह्म विवाह, अर्ष विवाह, दैव विवाह, प्रजापत्र विवाह, आसूर विवाह, गांधर्व विवाह, राक्षस विवाह व पिशाश्च विवाह होय. ब्रह्म विवाह ह्या ब्राह्मणी विवाहपध्दतीमध्ये 'आत्मकृत कन्यादान' अंतर्भूत होते. हुंडा देणे ह्या पध्दतीत कन्यादानासाठी कळीचे होते. ह्या उलट



असूर पध्दती ही सार्वत्रिक पध्दती होती व यापध्दतीत 'वधुमूल्ये' देण्याची प्रथा होती. ब्रिटिश राजवटीत विवाहव्यवस्थेला जेव्हा कायद्याच्या चौकटीत आणण्याचे प्रयत्न झाले तेव्हा ब्राह्मणी पुरुषप्रधानतेच्या अधिसत्तेमुळे बालविवाहाला 'कायदेशीर' ठरवण्यात आले. आणि हुंडा पध्दतीला जणू कायदेशीर पावती मिळाली. अशा विवाह पध्दतीत 'प्रेमाला' जागा असणे कठीणच. स्त्रियांच्या 'लैंगिकतेवर' संपूर्ण नियंत्रण मिळवून-जातीची उतरंड भक्कम करणे हेच-विवाहाचे प्रमुख उद्दिष्ट बनले. अभिजन संस्कृत साहित्यात 'शूक सप्तशतीच्या सत्तर गोष्टी' तरूण पत्नीच्या'व्याभिचारी' वृत्तीच्या व 'त्यांच्याकरिता पतिव्रता धर्माचे महत्व' ह्याच्या कथा सांगितल्या जातात.

## प्रसारमाध्यमपूर्व काळातही हिंसा होतीच !

पेशवाईतील 'कोतवाली (रूमाल किंवा दप्तर)' तपासून पाहिले तर बदकर्म, बदमल व बदफैली (व्याभिचार) हे स्त्रियांच्या बाबतीतील सर्वात अक्षम्य गुन्हे मानले गेले. अनेक स्त्रियांनी अत्याचाराला कंटाळून आत्महत्या केल्याचे दावेही ह्या रूमालात सापडतात. 'आंतरजातीय प्रेमाला' कठोर शिक्षा ठोठावली गेली व अनेकदा जर पुरुष उच्चजातीय व स्त्री कनिष्ठ जातीय असली तर त्या प्रेमाला व्याभिचार ठरवले जायचे. उलटपक्षी जर प्रियकर कनिष्ठ जातीय असला व प्रेयसी उच्च जातीय असली तर ह्या मुलीला स्त्रीला जातीतून काढून टाकले जायचे किंवा वेळप्रसंगी जातीच्या इज्जतीकरता तिला मारून टाकले जायचे.

उत्तर भारतातील आंतरजातीय प्रेमाबाबत झालेल्या एका पाहणीत असे दिसून आले की 'अशा प्रेमाचा' अंत हिंसेने केला जातो. १९९१-९७ ह्या काळातील अनेक अशा प्रेमाच्या संबंधाचा अंत प्रेमी युगलाला जाळून, फाशी देऊन किंवा कुऱ्हाडीने मारूनच झाला. 'लैंगिक गुन्हे' म्हणून ह्या प्रकरणावर पडदा टाकण्यात आला. पोलिसांनीही 'जातीच्या इज्जती' करिता सत्ताधारी जमीनदार जातींना साथ दिली. 'जाती बाहेर'पाऊल ठेवणाऱ्या मुलींचा हिंसक अंत करून इतर तरुण मुलींची लग्ने जातीतच होतील, त्या जातीबाहेर 'प्रेम' करण्याचे धाडस करणार नाहीत ह्याची खबरदारी घेतली जाते.

मुलींच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवण्याकरिता ब्राह्मणी पुरुषप्रधान व्यवस्थेने व जातिव्यवस्थेने हातमिळवणी केल्याचे आपल्या लक्षात येईल. ही हातमिळवणी दोन्ही व्यवस्थांना आपले अस्तित्व अधिक भक्कम करण्याकरिता गरजेची होती. आजही आपण लोकप्रिय हिंदी चित्रपटांची कथानके तपासून पाहिली तर आपल्या लक्षात असे येईल की 'आंतर वर्गीय' (गरिब हिरो श्रीमंत हिरोईन किंवा श्रीमंत हिरो -गरिब हिरोईन) 'प्रेम' दाखवले जाते. पण 'आंतरजातीय प्रेम' अभावानेच दाखवले जाते. दलित मुलगी व सवर्ण मुलगा यांच्यातील प्रेमसंबंध दाखवणारा एखादा 'सुजाता' सारखा चित्रपट बनतो पण दलित हिरो व सवर्ण हिरोईन यांच्यातील प्रेम दाखवणारा चित्रपट का बनत नाही, हे आता आपल्या लक्षात येईलच. जातिव्यवस्थेवर आधारित असलेल्या समाजात 'प्रेम'

‘विवाह’ ‘नातेसंबंध’ हे व्यक्तीपुरते मर्यादित कधीच नसतात. आपल्या समाजात म्हणूनच विवाहाला उघडपणे ‘दोन कुटुंबातील संबंध’ असे संबोधले जाते. हुंड्यासाठी सर्व सामुग्री विकून गहाण ठेऊन जातीअंतर्गतच विवाह ठरवले जातात. हुंड्यासाठी - मुलीचा छळ झाला, तिला जाळले गेले - तरी त्यात ‘कुटुंबाची /जातीची इज्जत’ असते. ब्राह्मणी पुरुषप्रधान व्यवस्थेच्या दुहेरी नितीमत्तेचा हा कळसच !

थोडक्यात, प्रसारमाध्यमपूर्व समाजातही अनेक प्रकारे मुलींना ‘नाही म्हणायचा अधिकार’ नाकारला जात होता - व त्यासाठी केशवपन - ते - सती, घरात कोंडण्यापासून - कुऱ्हाडीने मारुन टाकण्यासारख्या हिंसक मार्गाचा वापर केला गेला- जातो. म्हणजेच जातीव्यवस्थेवर आधारित समाजात तरुण मुलींच्या विरोधातील हिंसेला मोठा इतिहास आहे. मुली ह्या नियंत्रणाला प्रतिकार का करीत नाहीत? असा प्रश्न सहजच पडतो. ह्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला ‘सामाजिकरणाच्या’प्रक्रियेत सापडते.

**सामाजिकरणाची प्रक्रिया : पुरुषप्रधानव्यवस्थेचे नैसर्गीकरण**

कुटुंबव्यवस्थेमध्ये, पित्याच्या घरातील मुलीचे सदस्यत्व कधीच कायम स्वरुपाचे मानले जात नाही. वारसहक्क किंवा उत्पादन सामुग्रीवर मुली हक्क सांगू शकत नाहीत. कुटुंब, नातेसंबंधियांना व जात पंचायतीला मुलींवर नियंत्रण ठेवण्याचे सर्व अधिकार असतात.

लहानपणापासूनच मुलीचे ‘रुप’ पाहावे व मुलाचे ‘गुण’ पाहावेत असे सरळसोट विभाजन लागू केले जाते. ‘इतकी सुंदर-आहे की वाटेवरचा चोर सुध्दा पळवून नेईल’ किंवा ‘इतकी बुध्दी मुलीला काय उपयोगाची’- ह्या प्रकारच्या वाक्यांनी सामाजिकरणाला सुरुवात होता. मुलीवर खर्च करणे म्हणजे शेजाऱ्याच्या फळबागेला पाणी घालण्यासारखे आहे असे मानले जाते. भारतातील अनेक भाषांमध्ये मुलींना लवकर उजवून टाकण्यासंबंधी म्हणी आढळतात. उदा. छातीवरची धोंड म्हणणे किंवा मुलीची उपमा तूपाशी करणे (दोन्ही शूध्द असतात पण ‘शिळे’ झाले तर कुवासित बनतात) लहानपणापासूनच हे घर तिचे नाही- ही "waiting room' आहे - असे मुलींच्या मनावर अनेक प्रकारे बिंबवले जाते. घरातील गौरी पूजेसारख्या अनेक सणासूदीतून मुलींना ही जाण होते की एकदा विवाह झाला की माहेरी वर्षातून मर्यादित वेळेसच सासऱ्यांच्या परवानगीनेच येता येते.( गौरी शंकराच्या परवानगीने-१ ।। दिवसासाठीच येते.) अशा पूजाअर्चांमधून ‘कुमारीकेला’ देवीचे स्थान दिले जाते. विवाहप्रसंगी तर कलश घेवून नवऱ्या मुलाच्या मागे उभे राहण्याचा (करवली म्हणून) अधिकार तिला दिला जातो. ह्या सर्व दैनंदिन घटनांमधून ‘स्त्रीसुलभ’ स्वभाव घडवला जात असतो. पण मासिक पाळीची सुरुवात झाली - की, मुलीवरची बंधने अधिक कडक केली जातात. ‘विवाह’ (जातीअंतर्गत, घरच्यांनी ठरवून दिलेला) हेच एकमेव उद्दिष्ट तिच्यासमोर ठेवले जाते. तिच्या वेशभूषेवर वारंवार कडक नियंत्रण ठेवले जाते. जोरात न बोलणे, नजर वर उचलून न बोलणे, घरातील कामात स्वत:ला गुंतवणे - हे ‘गुण’ तिच्या मनावर बिंबवले



जातात. कुलिनतेचा संबंध या स्त्रीसुलभ वर्तनाशी लावला जातो. एखाद्या चुकीने ‘घरदाराची, जातीची इज्जत मातीत मिळते,’ अशी भावना निर्माण केली जाते. शिक्षणाचा मुलीला अधिकार नाही, त्यामुळे शिकवण्यासाठी घराबाहेर पाठवले तर मुलीच्या खांद्यावरचे उपकाराचे ओझे अधिकच वाढते. याप्रकारे घरातून अनेक मौखिक किंवा कर्मकांडरुपी संदेशातून पुरुषप्रधान व्यवस्था नैसर्गिक बनवली जाते. म्हणजेच, आपल्यापैकी अनेक जणांना या नात्यांमधील सत्तासंबंध जाणवत देखील नाही, मग त्या सत्तासंबंधांना प्रश्न विचारणे, प्रतिकार करणे, तर दुरच राहते. अशा या सामाजिकरणातून पुरुषप्रधान व्यवस्थेला ‘आज्ञाधारक’ तरुण सदस्या तर मिळतातच पण जातीअंतर्गत विवाह कायम करुन ब्राह्मणी जाती व्यवस्थेची अधिसत्ता मजबूत केली जाते.

**मुली ‘धमक्यां’बाबत घरात कोणाशी का बोलत नाहीत-याची उत्तरे या पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेच्या संरचनेतच सापडतात.** कुणी मुलगा Friendship (मैत्री) मागतो आहे - हे जरी घरी कळले, तर पहिला संशय तिच्यावरच घेतला जाईल व वेळप्रसंगी शाळेत । महाविद्यालयात जाणेही बंद होईल याची भिती मुलींच्या मनामध्ये कायम असते. महाविद्यालयात ही कोणाकडे तक्रार करायची सोय नसते. एखादे वेळीस ऋीळशपवीहळ (मैत्रीला) होकार देवून टाकणारी एखादी तरुणी जेव्हा निर्णय बदलते तेव्हा तर ती अधिकच कोंडीत सापडते. कारण पुरुषप्रधान समाजाच्या मते तिने ‘चुक’केलेली असते. ही सर्व परिस्थिती ओळखून बळजबरी करणारा मुलगा फायदा घेतो. ब्लॅकमेल करण्याची धमकी देतो. व अनेकदा मुलींना नाहक बळी जावे लागते. ह्या विश्लेषणातून ‘मुलींचे काहीच चुकत नाही - मुलेच Villain' (खलनायक) असतात असा निष्कर्ष काढणे चुक ठरेल.

लहानपणापासून विवाह हेच एकमेव ध्येय असे मनावर बिंबल्यामुळे, नवरा म्हणजे सर्व त्रासातून मुक्ती देणारा राजकुमार अशी प्रियकराची /नवऱ्याची प्रतिमा मुलीही मनात बाळगतात. नवऱ्याने उंचीने, शिक्षणाने, कामाने, पगाराने आपल्यापेक्षा वरचढ असले पाहिजे, ही मुलींची धारणा असते. म्हणून अनेकदा षीळशपवीहळ (मैत्रीला) पात्र ठरणारा मुलगा ‘नवरा’ म्हणून नापास होतो. म्हणून म्हणजे ‘नवऱ्याने’ वरचढ असले पाहिजे, सत्ता गाजवलीच पाहिजे. अशी मुलींचीही सामाजिकरणाच्या प्रक्रियेमुळे धारणा झालेली असते. ह्या स्त्री-पुरुषांमधील सत्ता संबंधांबद्दल स्त्रीमुक्ती चळवळीने आवाज उठवला. मुलींवर होणाऱ्या अत्याचाराचा प्रश्न हा त्या स्त्रियांचा किंवा मुलींचा खाजगी प्रश्न नसून तो राजकीय प्रश्न आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

**स्त्रीमुक्ती चळवळ: जे जे खाजगी ते ते राजकीय**

१९७० नंतर भारतात अनेक नवीन चळवळी उभ्या राहिल्या. आदिवासी, कष्टकरी, विद्यार्थी चळवळीमधून स्त्रिया कार्यकर्त्या म्हणून क्रियाशील राहिल्या १९७५ नंतर स्त्रीमुक्तीच्या विचारांची लाट जगभर पसरली.

अनेक स्त्रीवादी संघटनांनी स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडली. बलात्कार, हुंडा. कुटुंबांतर्गत हिंसाचार विरोधी अनेक आंदोलने उभी केली.

अत्याचाराचा प्रश्न 'खाजगी' नसून 'राजकीय' आहे. हे त्यांनी अधोरेखित केले. म्हणजेच समाजात रूढ असलेल्या सार्वजनिक / खाजगी या विभेदनालाच सुरुंग लावला. अर्थकारण, राजकारण (सार्वजनिक क्षेत्र) व घर, लैंगिकता, नातेसंबंध (खाजगी क्षेत्र) यांचे विभाजन करण्यात पुरुषप्रधान व्यवस्थेचा कावा आहे. असे स्त्रीमुक्तीवाद्यांचे म्हणणे होते. खाजगी क्षेत्रातही जाती, वर्ग, लिंगभावाचे राजकारण असते हे त्यांनी दाखवून दिले. स्त्री-पुरुषांमधील संबंध पुरुषप्रधान व्यवस्था नियंत्रित करते व म्हणून हे संबंध 'सत्तासंबंधच' असतात अशी मांडणी त्यांनी केली. पण पुरुषप्रधानव्यवस्थेतील सत्ताधारी अनेकदा आपल्या अतिशय निकटचे नातेसंबंधी असल्यामुळे (वडील, भाऊ, मित्र, प्रियकर, नवरा ...) हे सत्तासंबंध आहेत असे आपल्या लक्षात येत नाही. जेव्हा मुली /स्त्रिया आपल्या शोषणाला वाचा फोडतात तेव्हा - तो अत्याचाराचा प्रश्न 'खाजगी' राहत नाही. अनेकदा मुलींना / स्त्रियांना भेडसावणाऱ्या प्रश्नांमधील समान धागा लक्षात येतो - पण प्रश्नाला राजकीय धार येत नाही. उदा: १९९७ साली १८ वर्षीय रुपकुँवरला जेव्हा सती जाण्यास भाग पाडले गेले, तेव्हा तो प्रश्न फक्त रुपकुँवरचा राहत नाही. ती एक राजकीय घटना बनते. रुपकुँवरच्या देवराला या शेखावती प्रदेशात सती प्रथा नव्हती. पण स्वातंत्र्योत्तर काळात या प्रदेशात भूसुधारणा कायदा लागू झाला त्यानंतर त्या ठिकाणी क्षत्रिय व बनिया जातीच्या सत्तेला मर्यादा आल्या. या जातींनी भूसुधारणा कायद्याविरोधी आंदोलने सुरु केली. आणि या आंदोलनाला सांस्कृतिक पाया देण्यासाठी सतीप्रथेचा अवलंब केला. अनेक सतीमंदिरे उभारण्यात आली. ह्याला झालेल्या विरोधाला 'राजपुतांच्या'अस्मितेवरील हल्ला मानून सर्व उच्चवर्णीय पुरुषांनी या प्रथेच्या रक्षणासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात आले. हिंदुत्ववादी पक्षांनी व संघटनांनी सतीप्रथेला विरोध म्हणजे हिंदु धर्मावर हल्ला असे समीकरण केले. विरोधात असलेले स्त्रीवादी व डावे पक्ष पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाखाली आहेत व म्हणून रुपकुँवरने स्वेच्छेने घेतलेला निर्णय त्यांना समजणे शक्य नाही असा दावा करण्यात आला. थोडक्यात म्हणजे 'सतीप्रथेतील जातीय व पुरुषप्रधान हिंसेवर' 'स्वेच्छेने घेतलेल्या निर्णयाचा' मुलामा चढवण्यात आला व राजकीय प्रश्नाला व्यक्तीगत निर्णयाचे स्वरुप देण्याचे प्रयत्न झाले. स्त्रीमुक्ती चळवळीने स्त्रियांवरील अत्याचाराचे हिंसाचाराचे स्वरुप व्यक्तीगत नसून समाजव्यवस्था व राज्यव्यवस्था ही या हिंसाचाराचे समर्थन कसे व का करते ह्यावर प्रकाश टाकला.

रिंकु पाटील ते अमृता ते निता...ते अनिता या हिंसाराचाराच्या शृंखलेच्या बाबतीतही असाच विचार करणे गरजेचे आहे. प्रश्न कोणाचे प्रेम 'एकतर्फी' होते किंवा नव्हते, हा नसून गेल्या दशकात या प्रकारच्या घटना का घडल्या? याची व्यवस्थात्मक/संरचनात्मक कारणे कोणती? गेल्या दशकातील महत्वाच्या आर्थिक राजकीय घटना कोणत्या? त्यांचा या हिंसाराचाराशी काय संबंध. हे तपासून पाहणे गरजेचे आहे.

**मुक्त अर्थव्यवस्था व धार्मिक मुलतत्ववाद : वर्गीय, जातीय व लैंगिक शोषण**



गेल्या दशकातील दोन महत्वाच्या घटना म्हणजे मुक्त अर्थव्यवस्था व वाढता धार्मिक मुलतत्ववाद. जागतिकीकरणाचे किंवा मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण पाश्चात्य भांडवलशाही राष्ट्रानी आपल्यावर लादलेले आहे. त्याचे स्वरुप व परिणाम समजून घेण्यासाठी जागतिकीकरण हे जसे राजकीय अर्थकारणाच्या इतिहासातील घटना आहे तशीच ती चालाखपणे रूजवली गेलेली 'विचारप्रणाली' आहे हे आपल्याला समजून घ्यावे लागेल. १९७० नंतर जागतिक भांडवलशाही पुढे जो पेच निर्माण झाला होता - त्यातून मार्ग काढण्यासाठी भांडवलाची, व्यवस्थापनाची, बाजारपेठांची पुनर्रचना करण्यात आली. भांडवल व व्यवस्थापनामध्ये अधिक भौगोलिक लवचिकता आणली गेली. त्यामुळे पहिल्या जगातील बहुराष्ट्रीय कंपन्यांना उत्पादनस्थळ लवचिकरित्या आखता येऊ लागले. म्हणजेच तिसऱ्या जगातील स्वस्त श्रमाचा वापर ते करु लागले. तसेच जगात कुठल्याही बाजारपेठेत माल विकण्याची त्यांना परवानगी मिळाली. बाजारपेठेचा मुक्त विकास म्हणजेच 'मुक्त अर्थव्यवस्था ' भारतातल्या अर्थव्यवस्थेचे स्वरुप यापूर्वी वेगळे होते. सरकारी नियोजनाच्या व नियंत्रणाच्या छताखाली खाण, पोलाद निर्मिती, ऊर्जानिर्मिती, रासायनिक खते, सेवा, शिक्षण, वाहतूक, आरोग्य इत्यादी क्षेत्रे शासकीय भांडवलाच्या ताब्यात ठेवणारी अर्थव्यवस्था विकसित केली गेली. जगातील इतर 'अप्रगत' राष्ट्रांप्रमाणे भारतातील शासनांनाही शासकीय उत्पन्न व खर्च यांचा मेळ घालता न आल्याने अंदाजपत्रकात सतत तूट येत होती. ती भरून काढण्यासाठी शासनाला चलनवाढ करावी लागली. चलनवाढ झाल्यावर किंमती वाढून निर्यात कमी झाली आणि आयात वाढत गेली. त्यामधून व्यापारात झालेली तूट भरून काढण्यासाठी परकीय बँका आणि नाणेनिधी यांच्याकडून कर्ज काढणे शासनाला भाग पडले. या मदतीच्या बदल्यात, खाजगी भांडवलाला अधिक वाव द्यावा अशी अट घालण्यात आली. त्याचीच पुढची पायरी म्हणून १९९१ साली नवे आर्थिक धोरण जाहिर झाले. नवे आर्थिक धोरण म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून भांडवलशाही राष्ट्रांनी आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका या खंडातील अविकसित राष्ट्रांवर लादलेला नवा साम्राज्यवाद आहे. ह्या धोरणाचा समाजातील सर्व शोषित गटांच्या रोजगारावर प्रतिकूल परिणाम होत आहे. कामगारांना कामावरून कमी केले जात आहे, स्त्री कामगार असंघटीत क्षेत्रात फेकल्या जात आहेत. तर घटत जाणाऱ्या शासकीय क्षेत्रामुळे आरक्षणाच्या धोरणाला धोका निर्माण झाला आहे. शेती व्यवस्थेत ही भांडवली शेती छोट्या शेतकऱ्याला गिळून टाकत आहे. गेल्या दोन वर्षात कर्नाटक, आंध्र प्रदेश, हरियाणा, महाराष्ट्र ह्या राज्यात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. एकंदरित नाणेनिधी, जागतिक बँक व आपल्या देशातील ब्राह्मण-बनिया भांडवलशाहीचे हस्तक- जनतेवर नवे आर्थिक धोरण लादत आहेत. ह्यातून होणाऱ्या हिंसेला नाही म्हणण्याचा अधिकार त्यांना नाही! नाणेनिधी व जागतिक बँकेची नीती नवीन प्रकारच्या 'हिंसेचे' दर्शन घडवत आहे. ह्या सर्व हिंसेला 'जागतिकीकरण' असे गोंडस नाव देऊन ,जागतिकीकरण कसे अनिवार्य आहे किंवा विकासाचे जणू ते अंतिम ध्येय असल्याचा आभास निर्माण केला जात आहे.

हे जागतिकीकरणाचे धोरण प्रवेश करते- तेच धार्मिक- मूलतत्त्ववादाच्या जोडीने. जागतिकीकरण व धार्मिक- मूलतत्त्ववाद एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जगभरातील सर्व राष्ट्रांमध्ये खुल्या बाजारपेठांच्या बरोबरीनेच नवीन धार्मिक मुलतत्ववादी शक्तींचा जोर वाढल्याचे आपल्या लक्षात येईल. भांडवलाच्या पुनर्घटनेमध्ये उजव्या प्रतिगामी शक्तींचा प्रसार अंर्तभूत होता. जशी - जशी आर्थिक सत्ता जगातील १० ते ११ जागतिक कंपन्यांच्या हातात जाऊ लागते तशी - तशी राज्यकर्ते कोंडीत सापडण्याची शक्यता वाढू लागते. आपल्या राज्यसत्तेला अधिष्ठान देण्यासाठी प्रतिगामी राज्यकर्ते 'संस्कृतीचे राजकारण' उभे करतात. मग कधी 'राम-मंदिराचा' प्रश्‍न तर कधी 'सरस्वती वंदनेचा' तर कधी 'मुल्यशिक्षणाचा' यातून शिक्षण संस्थांचे दिवसेंदिवस होत असलेले खाजगीकरण, परदेशी शिक्षण संस्थेचा मुक्त प्रसार या कळीच्या प्रश्‍नावर पडदा टाकला जातो. मुलतत्ववादी या संस्कृतीच्या राजकारणाद्वारे पाश्‍चात्य संस्कृतीच्या प्रभावाचा बागुल-बुवा बनवून हिंसक पध्दतीने 'भारतीय (ब्राह्मणी) संस्कृतीचे'रक्षण करु लागतात. म्हणजेच मागच्या दाराने जागतिक कंपन्यांना अधिक क्षेत्रे खुली करुन देताना, पुढच्या दाराने, 'भारतीय संस्कृतीचे' संरक्षण करण्यास ते बाहेर पडतात. 'फायर' हा दिपा मेहतांचा चित्रपट हिंसकरित्या बंद पाडला गेला. या सिनेमातील समलिंगी संबंध हे पाश्‍चात्य संस्कृतीचे दर्शन घडवतात व ते भारतीय संस्कृतीवरचे आक्रमण आहे असा दावा करण्यात आला. खरे पाहता मनुस्मृतीमध्ये समलिंगी नाते ठेवणाऱ्या स्त्रियांना काय शिक्षा ठोठावली जावी याचे तपशील सापडतात. मग तेव्हा पाश्‍चात्य संस्कृतीचा प्रभाव कुठुन आला? किंवा परदेशी कंपनीच्या बुटाच्या जाहिराती जाळताना त्या कंपनीचे परदेशी असण्याबद्दल सूतोवाच न करता नग्न अवस्थेत जाहिराती करणारे मिलिंद सोमण व मधू सप्रे हे उच्च-जातीय आहेत व त्यांनी तरी 'संस्कृती जपावी' असे प्रतिपादन उजव्या शक्तींने केले म्हणजेच-निम फॅसिस्ट शक्तींची व जागतिक भांडवलदाराची हातमिळवणी झाल्याचे आपल्या लक्षात येईल. आर्थिक व्यवहारात ढवळाढवळ न करता बाजारपेठा खुल्या करुन देणाऱ्या निम फॅसिस्ट राज्यकर्त्यांना नैतिक शासन करण्याची मुभा दिली जाते. पाश्‍चात्य प्रभावाला - अर्थकारण जबाबदार आहे. यावर पडदा टाकून - वाढत्या हिंसाचे खापर प्रसारमाध्यमांच्या माथी मारले जाते. एकंदरीत 'हिंसेच्या संस्कृतीचे' इतके सहजी नैसर्गिकरण केले जाते की, मशीद पाडली जाते. शेतकरी व बलुतेदार जातींना सवलती देणाऱ्या मंडल विरोधी जाळपोळ होते, जागतिक संघटनांमार्फत हानीकारक गर्भनिरोधके स्विकारण्याची स्त्रियांवर जबरदस्ती केली जाते, रमाबाई आंबेडकर नगरातील जनतेवर गोळीबार केला जातो, दलितांवर होणाऱ्या हल्ल्यांचे प्रमाण वाढते. त्याकडे दुर्लक्ष करुन 'संस्कृती' वाचवण्याचे कार्यक्रम हाती घेतले जातात. ही 'संस्कृती' म्हणजे ब्राह्मणी, हिंदुत्ववादी संस्कृती हे सांगण्याची गरज नाही !

थोडक्यात रिंकू ते अनिता ह्या हिंसक घटनांचे विश्‍लेषण गेल्या दशकातील हिंसेच्या नैसर्गिकरणाच्या संदर्भात करणे गरजेचे आहे. हिंदुत्वाच्या व जागतिक बँकाच्या राजकारणाने नाही म्हणण्याचा अधिकारच हिंसकावून घेतला आहे. अशा परिस्थितीचा सर्वात अधिक परिणाम आधीच 'आवाज' नसलेल्या स्त्रियांवर, मुलींवर होणार- हे उघड



आहे.

**प्रसार माध्यमे : जागतिकीकरण व उपभोगवादी संस्कृती**

प्रसारमाध्यमे व हिंसा यांचा सरळसोट, प्रत्येक संबंध लावणे, फारसे बरोबर ठरत नाही. म्हणजे 'बाजीगर' सिनेमा पाहून काय सर्वचजण शाहरूखान सारखे हत्या करायला उठत नाहीत परंतु प्रसार माध्यमांचा अप्रत्यक्ष प्रभाव पडत असतो. भांडवलशाहीचा उगम व विकासाचा प्रसार माध्यमांशी जवळचा संबंध आहे. भांडवलशाहीच्या विविध टप्प्यावर प्रसारमाध्यमातील प्रतिमाही बदलत गेल्या असल्याचे आपल्या लक्षात येईल. १९५० नंतर पाश्‍चात्य देशामध्ये प्रसार माध्यमांनी (रेडिओ, दूरदर्शन, सिनेमा) भांडवली संस्कृती उत्पादित करण्याचे उद्योग सुरु केल्याचे दिसून येते. घरगुती उपकरणे कशी गरजेची आहेत, उत्तम गृहिणीची जणू ती लक्षणेच आहेत असे भासवले जाऊ लागले. जाहिरातीतून स्त्रियांनाच उपभोग्य वस्तु म्हणून प्रदर्शित करण्यात सुरुवात झाली मग जाहिरात शर्टिंगची असो अथवा रेझरची त्यात तंग/कमी कपड्यातील स्त्रियांना दाखवणे अनिवार्य होवू लागले. आपल्याकडेही १९७० नंतर हे चित्र दिसू लागले. पण १९८० पर्यंत- खाजगी व शासकीय प्रसार माध्यमे यांच्यात फरक करता येत होता. एकाचे उद्दिष्ट मनोरंजन तर दुसऱ्यांचे लोकसेवा व शिक्षण हे अधोरेखित केले गेले पण जागतिकीकरणाच्या लाटेत हे चित्र बदलले दिसते. शासकीय प्रसार माध्यमे अधिक - अधिक जाहिरातदारांवर अवलंबून राहू लागली. १९९१ नंतर तर परदेशी वाहिन्या आल्यानंतर चित्र संपूर्ण पालटले.

नव-भांडवलशाहीच्या रचनेमध्ये, चिन्हे, प्रतिके, प्रतिकृती, भासदर्शन व जाहिरातीबाजीची चलाख हाताळणी केली गेली. खुल्या बाजारपेठेचे गौरवीकरण करण्यासाठी प्रसारमाध्यमे कळीची होती. गेल्या दहा वर्षात प्रसारमाध्यम उद्योगातील स्पर्धा इतकी जीवघेणी झाली की, जागतिक पातळीवरती दहा कंपन्याच तग धरू शकल्या. नफ्याचा हिशोब घालण्याकरिता या कंपन्यांनी आपल्या उद्योगांच्या कक्षा वाढवल्या कधी Miss Universe, Miss World या सारख्या स्पर्धांमधून तर कधी लहान मुलांसाठीच्या Cartoon Films बनवणाऱ्या त्या कार्टून्स ची चित्रे असलेल्या वह्या, पुस्तके, कपडे, भांडी इ. च्या बाजारपेठा काबीज केल्या. उदा. Disney चलचित्र कंपनीची कुठलीही फिल्म प्रदर्शिक झाली की त्याची जाहीरातबाजी करण्याकरिता ते जगभरात १८,७०० दुकाने असलेल्या Mcdonald या बहुराष्ट्रीय खाद्यपदार्थांच्या श्रृंखलेशी हात मिळवणी करतात. आपल्याकडेही गेल्या दिवाळीत 'हम साथ साथ है' या सिनेमाच्या जाहीरातीने व कोको-कोला कंपनींने हात मिळवणी केली होती. या नवभांडवलशाही समाजात संपूर्ण 'सार्वजनिक' क्षेत्र जाहीरातीने व्यापून जाते पण सहज असा प्रश्‍न पडतो-की भारतासारख्या गरीब राष्ट्रामध्ये इतकी जाहीरात करण्याचा हा प्रयत्न का? गेल्या दहा पंधरा वर्षात भारतात एक नवीन उच्चमध्यम वर्गाचा उदय झालेला आहे. संगणक क्षेत्रात उच्चतंत्रज्ञानाच्या प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या या वर्गाची टक्केवारी भारताच्या लोकसंख्येच्या दहा टक्के असल्याने एक मोठा उपभोक्ता वर्ग

निर्माण झालेला आहे.

जाहिराती, सिनेमा इ. माध्यमांतून 'जीवनाचा आनंद' लूटा एवढाच एक संदेश दिला जात आहे. ४१ राष्ट्रांमध्ये केलेल्या एका पाहणीनुसार तरुण वर्ग दिवसातील ६ तास (किमान)'टि. व्ही.' पाहतो व जाहिराती पाहणे त्यात सर्वात जास्त पसंत करतो. जाहिरात बघताना आनंद लुटता येतो - विचार करावा लागत नाही - असे मत अनेक युवक - युवतींनी प्रगट केली या प्रसार माध्यमांचा इतका वाढतो की वास्तवाचे वर्णन किंवा विचार, प्रसार माध्यमांनी लोकप्रिय बनवलेल्या प्रतिकांच्या संदर्भात केला जातो. उदा: आग्रा येथील ताज-महाल पहाताना- तो ताजमहाल अगदी झाकीर हुसैनच्या 'वाह-ताज' मधल्या जाहिराती सारखाच आहे असे म्हणणे, जाहिरातींमुळे वस्तुंना 'चिन्हात्मक मूल्य' प्राप्त होते. वस्तू एखाद्या जीवनप्रणालीच्या चिन्ह बनतात. उदा: जीन्स पॅन्ट ह्या खुल्या (फ्री) जीवनप्रणालीचे प्रतिक/ चिन्ह म्हणून प्रदर्शित केल्या जाऊ लागतात. ह्याही पुढे केवळ 'जीन्स पॅन्ट'खरेदी करणे- त्या विशिष्ट जीवनप्रणालीसाठी पुरेसे ठरत नाही. अमुकच लीरपब च्या 'जीन्स'खरेदी करा म्हणजे 'खऱ्या अर्थाने'मुक्त जगू शकाल असा संदेश जाहिरातीतून दिला जाऊ लागतो. म्हणजे पूर्वी एखादा कपडा अधीक टिकाऊ आहे, सुंदर आहे म्हणून त्याची खरेदी केली जात असे. पण आता म्हणजे व्यक्ती फक्त वस्तु खरेदी करत नाहीत तर 'lable' किंवा 'brand' खरेदी करतात. म्हणून प्रत्येक lable, brand जाहिरातीतून 'जीवनप्रणाली' प्रदर्शित करतो एखाद्या सिगारेट जाहिरात Live Life King style असे, म्हणून 'मुक्त जीवनप्रणालीची जाहिरात करते तर एखादे 'गोरे होण्याचे क्रीम'ते क्रीम लावल्याने जीवनात प्रेम कसे फुलते हे उधोरेखित करते. टी. व्ही. वरील लोकप्रिय मालिकांच्या प्रत्येक break मध्ये जवळ-जवळ १८ ते २० जाहिराती दाखविल्या जातात. ह्यातील बऱ्याच जाहिराती तरुणतरुणी व पौंगांडावस्थेतील मुला-मुलींना market म्हणून केंद्रस्थानी ठेवून बनवलेल्या असतात. जागतिकीकरणानंतरच्या प्रसार माध्यमातून प्रदर्शित होणाऱ्या प्रतिमांमध्येही एक खासीयत आढळते. तरुणतरुणींसाठी असलेल्या talk shows मधून कुठची एक ठोस-भूमिका घेण्यास उत्तेजित केले जात नाही. उलट अनेक भूमिका मांडून एकाच वेळेस सर्व भूमिका कशा एकत्र नांदू शकतात  हा संदेश देऊन 'कुछ भी चलता है' ची संस्कृती पोसली जाते. विचार करण्यास प्रवृत्त न करणारीच प्रतिके मांडली जातात.

गेल्या दहा वर्षातील प्रसार माध्यमांव्दारे प्रदर्शित होणाऱ्या प्रतिमांमध्ये अजून काही वैशिष्ट्ये आढळतात. जाहिराती, सिनेमे यांच्यातून मोठ्या प्रमाणावर हिंन्दू चिन्ह, प्रतिके, विधी दाखवले जातात. 'हम आपके है कौन' हा चित्रपट याचे उत्तम उदाहरण आहे. मुली- स्त्रिया यांच्यामार्फत 'अस्सल भारतीय' पण प्रदर्शित केले जाते. 'परदेस' किंवा 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे' हे सिनेमे यांची उदाहरणे आहेत. ह्या दोन्ही सिनेमातील सर्व प्रमुख पात्र 'अनिवासी' भारतीय आहेत. 'परदेस' सिनेमाची जाहिरात तर "American Dreams - Indian soul' अशीच केली गेली. ह्या सिनेमात तरूण पिढी पुरूषप्रधानतेला शह देत असल्याचा आभास निर्माण करून. चित्रपटाच्या मध्यावर -



'आपली भारतीय (ब्राह्मणी-हिंन्दू) संस्कृतीचं' कशी खरी हे सांगितले जाते. व सिनेमा संपेपर्यंत तर तुम्ही भारतात राहत नसलात तरी मुली - सुनां मार्फत तुमचे 'भारतीयपण' कसे टिकून राहू शकते हे अधारेखित केले जाते. पेंट पासून थंडपेयाच्या जाहिरातींमध्ये संदर्भ हिंदू सणासुदीचा असतो. कोकाकोला वदिवाळी, एशियन पेंट व पोंगल, आय.सी.आय.सी.आय व गृहप्रवेश ह्या प्रतिमा आठवून पहा. परदेशी वस्तूंचा उपभोग घेताना संस्कृतीची चिंता नकोच. मुक्तपणे उपभोग घ्या- तुमची संस्कृती स्त्रियांच्या 'अस्सल भारतीय' पणात जोपासली जाईल असाच काहीसा संदेश दिला जातो. थोडक्यात म्हणजे उपभोगवाद व ब्राह्मणी संस्कृतीची जी उत्तम सांगड घातली जाते ती हिन्दुत्ववाद्यांची व जागतिकीकरणाच्या प्रणेत्या वर्गाची हातमिळवणी स्पष्टपणे दर्शविते.

जागतिकीकरणाने काही मूठभर स्त्रियांकरिता नवीन दालने खुली केली. पण ही सर्व क्षेत्र त्यांच्या शारिरिकतेवर किंवा लैंगिकतेवरच अवलंबून आहेत हे आपल्या लक्षात येईल. फॅशन, सौंदर्य, सेवा (हॉटेल,एअर कंपन्या इत्यादी) मध्ये त्या विशिष्ट वर्गातील स्त्रियांचे प्रमाण वाढते. तोकडे किंवा नवीन फॅशनचे कपडे घातलेल्या ह्या स्त्रियाच्या प्रतिमा 'स्वातंत्र्याचे' प्रतिक म्हणून पुढे केल्या जातात. जणू काही त्या स्त्रीवादी क्रांत्योत्तर (Post Feminist) समाजात वावरत आहे, असा आभास निर्माण केला जातो. ह्या स्त्रिया ह्या क्षेत्रांचा "Choice' (निवड) करत असल्याची भावना निर्माण केली जाते. 'निवडीच्या स्वातंत्र्याचा' गाजावाजा केला जातो. ह्या वर्षी "miss universe' म्हणून निवडून आलेल्या लारा दत्ताने ह्या स्पर्धांमुळे भारतातील तरूणींना किती नवीन दालने खुली होत आहेत असे मांडताना, विरोध करणारे 'नासमंजस' असल्याचा दावा केला. काही कंपन्यानी तर 'स्त्रीवादा'चाही बाजार मांडला. एका Washing machine च्या जाहिरातीतील स्त्री 'स्त्रीवादी' असल्याचा दावा करते व म्हणूनच नवऱ्याची परवानगी न घेता स्वत:च्या आवडीने वस्तूंची Choice करते- असा संदेश देते. स्त्रीवादाचा अतिशय चुकीचा अर्थ ह्या ठिकाणी प्रदर्शित केला जातो.

थोडक्यात 'निवड' करणाऱ्या स्त्रिया फक्त वस्तूंची निवड करतात- उपभोक्ता म्हणून कुठल्याच जाहिरातीतून त्या नागरिक म्हणून पुढे येत नाहीत हे लक्षात घेणे गरजेचे आहे. म्हणजेच 'खुल्या बाजारपेठाला' हिरवा झेंडा दाखवून तिचे स्वागत करताना, ह्या ठिकाणाच्या शोषण-शासनाच्या अस्सल भारतीय व्यवस्था कोलमडणार नाहीत याची पुर्ण तरतूद केली जाते. एका चेहऱ्याने (भांडवली) हिंदुत्ववादी राज्यकर्ते बहुराष्ट्रीय कंपन्यांना निमंत्रण देतात. व दुसऱ्या चेहऱ्याने (ब्राह्मणी-हिंदुत्ववादी) संस्कृतीचे रक्षण करतात, स्वदेशीची भाषा करतात, राष्ट्रहितासाठी, संविधानाची पुनर्तपासणी करण्याचे कार्यक्रमही आखतात. अर्थकारणाला संस्कृती नसते व संस्कृतीला अर्थकारण नसते असा आभास ते निर्माण करतात.हे किती खोटे आहे हे आपल्याला लगेच लक्षात येईल. 'रोझ-डे'च्या संस्कृतीला भांडवली कार्ड, शेती, उपभोग्य वस्तूंच्या कंपन्यांचे अर्थकारण असते तर संपूर्ण भेटकार्डांचे अर्थकारण ह्या 'डे' संस्कृतीशिवाय उभे राहू शकत नाही. पुन्हा याला अस्सल भारतीय स्वरुप देण्याकरिता हॉलमार्क् सारख्या बहुराष्ट्रीय भेटकार्डाच्या

कंपनीने हिंदी व मराठीतूनही प्रेमाच्या संदेशाची कार्ड छापली आहेत.

या सर्व चर्चेतून स्पष्टपणे दिसुन येते की गेल्या दहा वर्षात पाश्‍चात्य संस्कृतीचा प्रभाव वाढला आहे व त्यामुळे मुलींवरील हिंसा वाढली आहे असा सरळसोट अर्थ लावणे चुकीचे ठरेल. गेल्या दहा वर्षात उपभोगवादी, भणंग भांडवली संस्कृतीचा प्रसार वाढला, धार्मिक मूलतत्ववाद्यांच्या हिंसक संस्कृतीतही वाढ झाली असल्याचे आपल्या लक्षात येईल. 'मला जे पाहिजे ते मी मिळवू शकतो' (बाजारपेठेतून किंवा हिसकावून घेऊन) भरपूर बाजारपेठीय उपाय( कार्ड, भेटवस्तू इ.देऊन) करुन सुध्दा एखादी मुलगी 'पटली' नाही तर मी हिंसकरित्या तिला संपवू शकतो हे ह्या भांडवली, मूलतत्ववादी संस्कृतीचे, अर्थकारणाचेच प्रतिबिंब आहे.

सर्व प्रसार माध्यमातून दिसणाऱ्या वर्गाचा व आपल्या दैनंदिन प्रश्नांचा काहीच संबंध नसतो. जाहिराती, मालिका इ. मधून ग्रामीण, आदिवासी, कष्टकरी,दलित समाज दिसतच नाही. ग्रामीण location वरील जाहिरातींमध्ये ग्रामीण भाग नेहमीच 'राजस्थानातील एखाद्या सरंजामी कोठीचा असतो' सध्या सुरु असलेल्या मालिकांपैकी फक्त एकाच मालिकेमध्ये ( नया जमाना) कष्टकरी वर्गातील कुटुंब दाखवले आहे. पण बाप दारुडा, आई मोलकरीण-या परिस्थितीला कंटाळून त्यातील तरुण मुलगी अरबांसाठी वेश्या बनते. म्हणजे अंतिमत: पुरुषप्रधानव्यवस्थेचा, जातीव्यवस्थेचा व भांडवलीव्यवस्थेचा विजय होतो.'खुल्या बाजारपेठेचे आकर्षण कोणालाच टाळता येत नाही ' हा संदेश खुल्या बाजारपेठेच्या संस्कृतीचा व ब्राह्मणी, हिंदुत्ववादी हिंसक संस्कृतीचा विजय- रिंकू ते अनिता या हिंसक घटनांमध्ये प्रतिबिंबित होतो.

**थोडक्यात आढावा घेतल्यास खालील मुद्दे पुढे येतात:**

१) हिंसाचाराच्या प्रश्नांचा असा व्यापक विचार करत असताना असे प्रकर्षाने जाणवते की या मुद्यांच्या संबंध बहुतांश वेळी चित्रपट केबल टी. व्ही. आणि इतर प्रसार माध्यमातून दाखवला जाणारा हिंसाचार, रुजवली जाणारी नवी हिंसक मुल्ये आणि संस्कृती यांच्याशी जोडला जातो. परंतु अशा प्रकारे हिंसाचाराबद्दल प्रसार माध्यमांना दोषी ठरविणे म्हणजे हिंसाचाराचे एकांगी आणि अनैतिहासिक विश्लेषण होईल. कारण स्त्री चळवळीने दाखवून दिले आहे की, समाजाच्या विकासाच्या कोणत्याही टप्प्यांवर हिंसाचार नाही असे आढळत नाही. त्याचप्रमाणे हिंसाचार किंवा प्रेमात मालकीची भावना ही जुन्या हिंदी चित्रपटात नाही असे नाही. कारण पूर्वीच्या चित्रपटातही 'तू किसी और को चाहो तो मुश्किल होगी' अशा आशयाची मालकीची भावना दाखवणारी गीते, संदर्भ सापडतातच. मग वाढत्या हिंसाचारासाठी नवीन चित्रपटांना दोषी ठरविणे कितपत रास्त ठरते? असा प्रश्न पडतो. अर्थातच, इथे असे नक्कीच म्हणायचे नाही की, चित्रपट किंवा प्रसार माध्यमातून दाखवला जाणारा हिंसाचार बदललेला नाही. हिंसाचाराचे स्वरुप, प्रमाण निश्चित वाढले आहे. जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर हिंसाचाराची विविध रुपे आढळतात. एकूण वाढलेला हिंसाचाराचा जागतिकीकरण, त्याबरोबर येणारी खुली बाजारपेठ, अर्थकारण यांच्याशी आहे. (२) म्हणजेच या संदर्भात जर माणसाचा



जीवनप्रणालीचा विचार केला तर लक्षात येते मनुष्याला प्रत्येक क्षेत्रात असलेली उपलब्धता वाढत चालली आहे. पण त्याबरोबर समोर असणारे पर्याय कमी होत चालले आहे. म्हणजेच आज हिंसाचाराची विविध माध्यमे उपलब्ध आहेत. पण ज्याच्यावर हिंसा होते त्याला हिंसेपासून बचाव करण्याचा कुठलाही पर्यायी मार्ग उपलब्ध नसतो. अशाप्रकारे सर्वांना उपलब्ध असणारे पर्याय कमी होणे, हिंसाचाराचे वाढते प्रमाण यासाठी थोडे भूतकाळात डोकवावे लागेल. म्हणजे स्वातंत्र्याप्राप्तीनंतरची दुसरी पिढी ज्याला Mid Night पिढी असेही म्हटले जाते, ती विचारात घेतल्यास जाणवते की, त्या पिढी समोर एक राष्ट्र बांधणीचे स्वप्न होते. एकूण समाजात लोकशाही समाजवादी मूल्यांवर विश्वास प्रभाव होता. (३) परंतु, कालांतराने जेव्हा भारतातील लोकशाही समाजवाद हे फक्त एक घोषवाक्य म्हणून उरलेले आहे. याची जाणीव निर्माण झाल्याने पुन्हा एकदा सत्तरच्या दशकात भारतामध्ये अनेक विद्यार्थी चळवळी नव्याने उभ्या राहिल्या. ८० च्या दशकात रशियातील प्रत्यक्ष प्रस्थापित समाजवाद कोसळला, त्याबरोबरच एकूण या मूल्यांवर विश्वास असणाऱ्या चळवळींचा भर ही ओसरल्याचे दिसून येते. त्यामुळे मग आमच्या युवा पिढी समोर चळवळीचे अथवा बंडखोरीचे फारसे 'पर्याय' उरले नाहीत. मग आमच्या युवा पिढी समोरील बंडखोरी म्हणजे 'रॅप' संस्कृती आत्मसात करणे. थोडक्यात बंडखोरी म्हणजे प्रसार माध्यमातून दाखवलेली बंडखोरीची संस्कृती जी फक्त प्रतिकांपुरती मर्यादित राहिली. म्हणजेच, सद्या युवक संस्कृतीचा विचार केला तर जाणवते की, स्त्री चळवळीने जे जे वैयक्तिक ते ते राजकीय या घोषवाक्याने अनेक अन्याय अत्याचारांना वाचा फोडली त्यालाच आता डोक्यावर उभे केले आहे. म्हणजेच जे जे राजकीय ते ते वैयक्तिक असे मानले जात आहे. म्हणजेच एकूणच चळवळींची पिछेहाट झाल्याचे आढळते. (४) या चळवळीच्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर जर आपण रिंकू ते तनूजा आणि इतर अनेक घटना आणि त्यासंबंधीच्या प्रतिक्रिया विचारात घेतल्यास कायमच नव्या पिढीला दोषी ठरविले जाते. प्रेमात 'नव्याने' आलेल्या हिंसाचाराबद्दल खेद व्यक्त केला जातो. पण अशाप्रकारे हिंसाचार अचानक आला आहे, असा आरोप करणे गैर होईल कारण ५० ते ७० या दशकाचा विचार केल्यास त्या काळात स्त्रिया घराबाहेर पडत होत्या, शिक्षण घेत होत्या त्या काळातील तरूण-तरूणी मधील नात्याचा- प्रेमाचा विचार केल्यास लक्षात येते की निर्माण झालेल्या नात्याचे रुपांतर हे लग्नात होऊ शकले नाही. म्हणून ती स्त्री जन्म अविवाहीत राहते. म्हणजे तिला एकप्रकारे जन्मठेपेची शिक्षा मिळते. परंतु आधी म्हटल्याप्रमाणे ७५ ते ८५ मधील उभ्या राहिलेल्या नवीन सामाजिक चळवळींनी या पिढीसमोर पर्यायी उभे केले होते. म्हणूनच अनेक तरूण-तरूणी चळवळीत सामील झाले. (५) या पार्श्वभूमीवर सद्य तरूण पिढी समोरील पर्यायांचा विचार केल्यास त्याच्यासमोर दोन पर्याय असल्याचे दिसते. एक म्हणजे नव्याने प्रबळ झालेल्या मूलतत्त्ववाद्यांच्या प्रतिगामी, जातीय उजव्या चळवळीत सामील होणे किंवा मग भांडवलशाही बरोबर आलेली भणंग संस्कृ ती आत्मासात करणे. अर्थातच

जागतिकीकरण व मूलतत्ववाद यांचा परस्पर संबंध नाही असे म्हणायचे नाहीए. कारण जागतिकीकरण आणि मूलतत्ववाद यांच्या हातमिळवणीची अनेक उदाहरणे देता येतात. याचा पुरावा म्हणजे स्वदेशी जागरण मंच स्थापणारे आणि त्याला पाठींबा देणारे सत्ताधारी एन्रॉनविरोधी आंदोलनास राष्ट्रविरोधी आंदोलन म्हणून त्याची निंदा करतात. आणखी एक पुरावा म्हणजे, मूलतत्ववादी असे भासवण्याचा प्रयत्न करतात की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक व सामाजिक असे दोन कप्पे करणे शक्य आहे. त्यायोगे मग ते मायकेल जॅक्सन शो किंवा मिस वर्ल्ड सारख्या कार्यक्रमांना राष्ट्रीय भांडवल उभारणीसाठी फायदेशीर म्हणून मान्यता देतात. आणि दुसरीकडे 'फायर' सारख्या चित्रपटावर संस्कृतीच्या नावाखाली टिकेची झोड उठवतात. म्हणजेच एकंदरित जागतिकीकरणाची बाजारपेठीय संस्कृती वस्तूंची उपलब्धता वाढवते आणि व्यक्तीला निवडीचे स्वातंत्र्य देते पण व्यक्तीला पर्यायांचा विचार करण्यास प्रवृत्त करत नाही. तसेच दुर्गावाहिनी, संघ परिवार यातील संस्कृती देखील हिंदू पुरूषप्रधान परंपरेला अनुसरून व्यक्तीला प्रश्न विचारण्याची जागा ठेवत नाही. पर्यायाने मग ते एकूण सर्वच क्षेत्रात गतिशील असलेला समाज हा संस्कृतीच्या क्षेत्रात मात्र स्थितीशील असल्याचे भासवतात आणि समाजावरची आपली पकड घट्ट करतात. परिणामी मग सत्तेला प्रश्न विचारणारे गट किंवा व्यक्ती खपवून घेतली जात नाही. (६) जे कोणी या सत्तासंबंधाना प्रश्न विचारतील त्यांना नेस्तनाबूत करण्यात येते. म्हणूनच मग भंवरी देवीवर बलात्कार करण्यात आला, ओरिसामध्ये अल्पसंख्यांकांवर हल्ले होत आहेत आणि याहून क्रौर्याची परिसीमा गाठणारे बिहार येथील रणवीर सेनेने केलेली दलितांची हत्या. याचा व्यापक पातळीवर विचार केल्यास आढळते की एकूण भारतात व जगात फॅसिस्ट शक्तींचा उदय झालेला आहे. ते जातीचा वापर करीत आक्रमक होत आहेत. (७) अशा राजकीय परिस्थितीत नव्या पिढीचे अवलोकन केल्यास दुसरी बाजू दिसते की नव्या पिढीवर संगणकाचा असलेला प्रभाव. किंबहुना नवी पिढी 'संगणकपिढी' म्हणून ओळखली जाते. तात्पुरते जरी आपण संगणकाव्दारे आलेले अश्लिल साहित्य किंवा विस्फोट बाजूला ठेवले तरी Computer Game च्या माध्यमातून जी हिंसा दाखवली जाते त्याचा फार मोठा परिणाम तरूण पिढीवर झालेला दिसतो. थोडक्यात जर आपण या खेळांचा आढावा घेतला तर लक्षात येते की बहुतेक खेळांमध्ये खेळाडूने त्याच्या वाटेत (त्याचा अडथळा होवो न होवो) त्याला मारायचे अशा प्रकारची हिंसक संस्कृती ही संगणकामार्फत जो सद्य पिढीचा संदर्भबिंदू आहे, रूजवली जात आहे, परिणामी गटांएवजी फॅसिस्ट युवा आघाड्या किंवा 'स्वायत्त' आहोत असा गैरसमज असणारे युवक-युवती दिसतात. (८) अशा परिस्थितीत जर तरूण तरूणींच्या नातेसंबंधाकडे वळलो तर लक्षात येते की आता महाविद्यालये आणि इतर ठिकाणी मुला- मुलींचा संपर्क वाढते आहे. अर्थातच, संपर्क वाढला आहे किंवा मैत्री आहे याचा अर्थ नात्यांमध्ये मोकळेपणा आला आहे असे म्हणता येणार नाही. कारण अजुनही नात्याला नाव हे द्यावच लागतं. म्हणजे जितक्या सहजतेने मुलीमुलींची मैत्री कुठल्याही विशेष



नावाशिवाय स्विकारली जाते तितक्या सहजतेने मुलामुलींची मैत्री कुठल्याही विशेष नावाशिवाय स्विकारली जात नाही. मुलामुलींची मैत्री असेल तर त्याला फक्त मैत्री (just friends) का विशेष मैत्री (special friends) का मग,' खास मैत्री'(going steady) अशी विशेष नावं द्यावीच लागतात. यातून स्पष्ट होते की जरी मुलामुलींचा संपर्क वाढला असला तरी अजुनही मैत्रीत निकोपता किंवा मोकळेपणा आलेला नाही. (९) ही व्यापकता लक्षात घेऊन मुलांच्या व मुलींच्या कौटुंबिक जडणघडणीकडे वळलो तर जाणवतं की आज मुली घराबाहेर पडल्या आहेत, शिक्षण घेत आहेत पण जर त्यांना असलेल्या व्यक्तीस्वातंत्र्याचा विचार केल्यास त्याच्या कक्षा फारश्या रूंदावलेल्या आढळत नाही . म्हणजे एकीकडे घराबाहेर पडल्या असल्याने जे स्वातंत्र्य मिळते त्यानुसार एखादी मैत्री-नातं निर्माण झालं तर त्याबद्दल घरी बोलायची सोय नाही. कारण मग जे थोडफार मिळालेले स्वातंत्र्य आहे त्यावरही घाला येण्याची शक्यता आहे. जसे मुलीचे लग्नाचे वय जवळ येते तसे मग तिच्यावरील जातीवर्गाची बंधने अधिकच तीव्र होत जातात. म्हणजेच एकुणच लग्न किंवा तत्सम महत्वपुर्ण निर्णयांवर कौटुंबिक आणि जातीनिहाय बंधने असलेली दिसून येतात. त्याचबरोबर पुरूषप्रधान संस्कृतीत घडलेल्या पुरूषाला नाही ऐकण्याची सवयच नसणे आणि मुलीला घरात किंवा घराबाहेर आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य नसणे याचा एकत्रित परिणाम तरु ण- तरुणींच्या नातेसंबंधावर होतो. (१०) या सगळ्या कोंडीतून तिला बाहेर पडण्याचा कुठलाच पर्यायी मार्ग नसतो. कारण समाजात तिला कुठलाही आधार नसतो. याबरोबरच या संपूर्ण प्रक्रियेत स्व-प्रतिमेच्या घडणीचा विचार केल्यास आढळते की एकु ण शरीराला वेगळेच महत्व प्राप्त झाले आहे. शरीराला प्राप्त झालेले असाधारण महत्व आपल्याला वाढते प्रसाधन उद्योग, सौंदर्य स्पर्धा आणि जीम संस्कृती यातून दिसते. असे शरीराला असाधारण महत्व दिल्याने मग त्याची विटंबना करणे किंवा मारणे हे जास्त धक्कादायक वाटत नाही कारण शरीर ही वस्तू मानली जाते जी कोणाच्या तरी मालकीची असते. हे झालेले वस्तुकरण मग युवा संस्कृतीत प्रतिकांना असामान्य महत्व प्राप्त करुन देते. मग एखाद्या विशिष्ट नावाची/ Brand ची जीन्स घालणे म्हणजे बंडखोरी होते किंवा Live Life King Size याला आयुष्यात महत्व प्राप्त होते. थोडक्यात वस्तु या वस्तु न राहता जीवनशैलीची प्रतिके बनून राहतात. थोडक्यात ग्राहकतत्वातच मुक्ती असे प्रस्थापित होते. (११) मग भावना व्यक्त करण्यासाठी ही वस्तुचाच आधार घेतला जातो. म्हणजे मग प्रेम व्यक्त करण्यासाठी एक दिवस निश्चित केला जातो. त्याचबरोबर कुठली भावना व्यक्त करण्यासाठी कुठल्या रंगाचे फुले, कुठले कार्ड हेही निश्चित होते. त्याबरोबर मत सर्वेक्षणात (Opinon poll) असे जाणवते की विवाहपूर्व लैंगिकतेला मान्यता

देण्याची संख्या वाढते आहे. परंतु यामधील क्रांतीची शक्यता नाहीशी होवून त्यातही शरीराचे वस्तुकरण झालेले दिसते. (१२) जेव्हा शरीराचे वस्तुकरण होते व भावना व्यक्त करण्यासाठी वस्तुंचा आधार घेतला जातो तेव्हा व्यक्तीच कधी वस्तु बनून जातात त्याचं भान सुटते. म्हणजेच वस्तु जेव्हा हवी ती सेवा देण्यास नकार देते तेव्हा ती वस्तु फेकली जावून दुसरी वस्तु त्या वस्तुची जागा घेते. तितक्याच सहजतेने एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा खात्मा करते. अशा प्रकारे हिंसाचाराला अधिमान्यता असलेल्या संस्कृतीत बळी जातो तो स्त्रियांचा. प्रामुख्याने त्यातल्या त्यात विशिष्ट वय, जाती, वर्गाच्या उतरंडीवर खालच्या थरातील स्त्रियांचा. (१३) या विषयीचा आवाका लक्षात घेता एकत्र येवून तरुण-तरूणींच्या गटांमध्ये काम करणे व समतेचे प्रबोधन रूजवणे गरजेचे आहे.

**पर्यायी गरज: संघटन व पर्यायी 'प्रेमा'च्या संकल्पना**

रिंकू-अमृता-सत्वगुणी-अनिता ह्यांचा प्रश्न त्यांच्या एकट्यांचाच नव्हता. हिंसेचा प्रश्न 'राजकीय' प्रश्न आहे. त्यांचा प्रश्नही व्यक्तीगत नव्हता, पण त्या एकट्या होत्या. एखादीने मैत्रिणीला किंवा आई-बहिणीला सांगितले देखील असेल -पण शेवटी-दोन व्यक्ती या गुंडशाहीमध्ये काय करु शकणार. संघटनेच्या पाठबळाची गरज असते. हिंसेला तोंड देण्याकरिता संघटनात्मक पातळीवरती एकजूट करणे गरजेचे आहे. हा प्रश्न फक्त तरुणींचा किंवा विद्यार्थींनीपुरता मर्यादित नाही. वर विश्लेषण केल्याप्रमाणे संपूर्ण उपभोगवादी, ब्राह्मणी, हिंदुत्ववादी अर्थकारणाला व संस्कृतीला शह देण्याची गरज आहे. फी - वाढ, आरक्षणविरोधी भूमिका, शिक्षण क्षेत्राचे खाजगीकरण हे सर्व विद्यार्थ्यांचे प्रश्न आहेत. तसेच मुलींविरोधी हिंसेचा प्रश्न हा सर्वांचा आहे. कारण या सर्व प्रश्नांची पाळेमुळे एकमेकात गुंतलेली आहेत. एकाला वाढवून दुसऱ्याला मोडून काढता येणार नाही. म्हणून विद्यार्थी - विद्यार्थींनीच्या एकजूटीची - संघटनात्मक कृतीची गरज आहे.

मग मुला-मुलींमध्ये 'प्रेम'भावना असू शकत नाही का ? सर्व काही बाजारपेठेच्या किंवा मुलतत्ववाद्यांच्या कचाट्यात सापडलेले आहे का? उपभोगवादी/ ब्राह्मणी प्रेमाच्या संकल्पनेला काही पर्याय नाही का?

आपल्याच समाजातील अब्राह्मणी भक्ती, वारकरी परंपरा चळवळ, सुफी संप्रदायात प्रेमाच्या पर्यायी संकल्पना आढळतात. संत मीरेच्या 'प्रेमाने' जातीव्यवस्थेच्या, पुरुषप्रधानतेच्या नियमांना मोडून काढण्याचा प्रयत्न केला. संत मीरेच्या स्वत:च्या राजपूत जातींने मात्र तिची अवहेलना केली व गेल्या दशकात मात्र तिचा हिंदू 'राजपूत-अस्मितेला' जगण्यासाठी वापर केला जात आहे. सुफी संप्रदायात प्रेमाची संकल्पना मैत्रीच्या भावनेवर आधारलेली आहे.



१९ व्या शतकात म. फुले जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातून पर्यायी 'सत्यशोधक प्रेमाची' संकल्पना आपल्यासमोर उभी राहते. या प्रेमात एकमेकांवर सत्ता गाजवली जात नाही, याऊलट एकमेकांच्या कार्याला हातभार लावला जातो. हे प्रमे व्यक्तींना 'व्यक्तीकेंद्री' आणि तू व मी आपले छाटेसे जग बनवत नाही. याउलट समाजाभिमुख बनवते. दोघांनी-इतरांबरोबर मिळून संघटित होवून व्यवस्था बदलण्याचे स्वप्न देते. विचारांची देवाण-घेवाण भावनांच्या देवाण-घेवाणी इतकीच महत्वाची मानली जाते. बांधिलकी एकमेकांशी तर असतेच पण विचारांशी, सामाजिक परिवर्तनाशी देखील तेवढीच असते. एकमेकांच्या साथीने नवीन काही उभे करण्याचा ध्यास असतो. जोतिबा-सावित्रीने शाळा सुरु केली, एकमेकांच्या साथीने अनाथ-विधवा आश्रम सुरु केले. सामाजिक पालकत्वाचे एक नवे प्रमाण उभे केले. व्यक्तीकेंद्री समाजापासून तोडून टाकणारे प्रेम-अल्पजिवी असतेच. तसेच भांडवली-ब्राह्मणी-पुरुषप्रधान संस्कृतीचा तो पाया आहे. कारण भांडवली संस्कृती व्यक्तीकेंद्री उपभोगवादाचा प्रसार करते तर ब्राह्मणी, पुरुषप्रधान संस्कृती आपल्या कुटुंबाच्या, जातीच्या सीमारेषा अधिक बळकट करताना स्त्रियां भोवतीच्या भिंती अधिक उंच करते. संघटित होवून हिंसेच्या प्रश्नाला शह देताना, 'नीरसच' जगावे लागते असे नाही. सत्यशोधकी प्रेमाचा सकस पर्यायी आपल्यासमोर आहेच !